गोष्टीवेल्हाळ
अभिजित, जितेन्द्र, अश्विनी,
आदित्य आणि अमित
यांना-

BVBK-0402896

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | कडक पॉली मावशी | ५ |
| २. | चर्चमधला गोंधळ | १३ |
| ३. | स्मशानातलं धाडस | १७ |
| ४. | नदीवरचे चाचे | २४ |
| ५. | डॉबिन्सची फजिती | ३३ |
| ६. | इन्जुन ज्योच्या मागावर | ३९ |
| ७. | खजिन्याची गुहा | ४९ |

२८९९ दिनांक 9/9/८४

## १. कडक पॉली मावशी

डोळयावरचा चष्मा सावरत पॉली मावशी स्वयंपाकघरात आली. संतापाने तिचा चेहरा फुलला होता. तोंडाने ती काहीतरी पुटपुटत होती. बहुधा ती टॉमला शिव्या मोजत असावी.

'टॉम'--- तिनं मोठयानं हाक मारली.

'टॉम '--- तरीही टॉमचं उत्तर नाही.

'नतद्रष्ट कारटं, कुठं मसणात गेलंय् कुणास ठाऊक ! थांब, तू माझ्या हाती लागलास की, तुझ्या पाठीचं धिरडं करते. मग तू आहेस आणि मी---'

संतापलेली पॉली मावशी अशी स्वत: शीच बडबडत होती. बोटं मोडत होती.

इतक्यात तिच्या मागून हळूच कोणीतरी जात असल्याचा तिला भास झाला.

'ही मांजरंही मेली अशीच माजली आहेत अलिकडं---', असं बोलत पॉली मागं वळली आणि विजेचा धक्का बसावा तशी उडालीच.

मांजराच्या पावलानं टॉम हळूच निसटू बघत होता. पॉली खेकसली,

'कोण ? तू ? कारटया, पन्नास हाका मारल्या असतील मी तुला. कुठं होतास तू ?'

इतक्यात तिचं लक्ष मोठया कपाटाच्या हलणाऱ्या दाराकडं गेलं.

'अग्गो बाई ऽऽ - म्हणजे या मोठया कपाटात का तू लपून बसला होतास ?-- माझ्या हे अगोदरच लक्षात यायला हवं होतं. खोड्या केल्यास की तू नेहमी या कपाटात लपून बसतोस.'

टॉमनं चेहरा अगदी सभ्य करुन म्हटलं,

BVBK-0402896

'पण मावशी, मी कुठं काय केलंय् ? मी तर---'

'चूप ! एक अक्षर बोलशील तर थोबाडून काढीन ! आणि हात काय मागं लपवतोयस तू ? आँऽऽ--- बोल ! हात कर पुढं ! करतो की नाही ---'

'पण मावशी---'

'हात पुढं कर ! कारटया---'

चेहऱ्यावरची सुरकुती न हलवता टॉमनं दोन्ही हात पुढं केले.

पॉलीला भोवळच आली.

टॉमचे दोन्ही हात मुरंब्यानं भरले होते.

'आँ ? चांडाळा, मी कष्टानं घातलेला मुरंबा तू खाऊन टाकलास ? थांब, आता तुला झोडपून काढते.

कोपऱ्यातील वेताची छडी उचलून पॉली टॉमकडं धावली.

टॉम मनात म्हणाला---'आता मेलोच मी.' पण त्या अवघड क्षणीही त्याचा मेंदू वेगानं काम करत होता. क्षणार्धात त्यानं चेहरा वेडावाकडा केला आणि तो किंचाळला,

'अरे बापरे--- मावशीऽऽ--- अग, तुझ्या मागं काय आहे बघ--- बापरेऽऽ---'

दचकून पॉलीनं हातातली छडी खाली टाकली आणि घाबरुन मागं वळून पाहिलं.

मागं काहीच नव्हतं.

टॉमनं तेवढी संधी साधली आणि खिडकीतून बाहेर उडी घेतली. बागेचं कुंपण ओलांडून बघता बघता तो पसार झाला.

पॉली मावशी मागं वळून पाहेतोपर्यंत टॉम अदृश्य झाला होता.

पॉलीला हसू फुटलं. तिच्या रागाची जागा हसण्यानं घेतली. ती स्वत:शीच पुटपुटली,

'मोठा चावट आहे हा पोरगा. अशा युक्त्या करुन मला फसवतो आणि मीही फसते.--- पण कारटयानं माझा मुरंबा--- झालं, सगळी बरणी रिकामी केलीय् टॉमनं !'

टॉम हा असाच व्रात्य आणि खोडकर होता. मावशीला कळू न देता त्यादिवशी त्यानं शाळेला झकासपैकी दांडी मारली होती. पण शाळा सुटण्याच्या वेळेला तो ईमाने- इतबारे घरी दाखल झाला होता- पण घरातही त्याचे उपद्व्याप चालू होतेच.

पॉलीनं जिम नावाचा निग्रो नोकर ठेवला होता. त्याला टॉमनं मदत करावी असा पॉली मावशीचा कायदा होता. पण जिमला मदत करण्याऐवजी टॉम त्याला त्याच्या कल्पनेतून निघालेल्या भन्नाट कथा ऐकवायचा आणि त्या गोष्टीत रमलेला जिम स्वत:बरोबर टॉमचंही सगळं काम करत असे.

पण एक गडबड होती.

टॉमला अडचणीत आणणारं एक प्रकरण होतं आणि ते म्हणजे सिडचं. सिड हा टॉमचा सावत्र भाऊ होता. सिड तसा नाकासमोर बघून चालणारा मुलगा.

उगाच कुणाच्या अध्यात - मध्यात पडणं, त्याला पसंत नव्हतं. अभ्यासातही तो सगळया मुलांच्या पुढं.

पण सिडला एक भारी वाईट खोड होती आणि ती म्हणजे टॉमबद्दल चहाड्या करण्याची.

टॉमचे दिवसभरातले उपद्व्याप पॉलीजवळ सांगितले की सिडला धन्य वाटायचं.

त्यामुळं टॉम आणि सिडचं नातं म्हणजे विळया- भोपळयाचं सख्य दाखवणारं !

आज पॉली मावशीला गुंगारा दिल्यावर टॉम गल्ली बोळातून भटकण्यासाठी रिकामा झाला. शिट्ट्यांचे विविध प्रकार आत्मसात करत टॉमची स्वारी रस्त्यातून स्वच्छंदपणे निघाली होती.

कधी तो तोंडानं शीळ घालत होता. तर कधी तोंडात चक्क बोटं खुपसून !

अचानक त्याला शाळेत नवीनच आलेला मुलगा दिसला. त्याच्याशी टॉमचं काही बरं नव्हतं. खेड्यात आणि शाळेत नवीनच आलेला तो मुलगा टॉमपेक्षा मोठा आणि दांडगट होता.

टॉमला त्याची पर्वा नव्हती. दोघंही युध्दाला आल्याप्रमाणं एकमेकांसमोर उभे राहिले. मुसंडी मारणाऱ्या डुकराप्रमाणं दोघंही एकमेकाकडं खुन्नसनं बघत राहिले.

मग टॉम म्हणाला,

'बहुधा आज तू अंग भरून मार खाणार आहेस !'

'अच्छा ? मग होऊन जाऊ दे.'

'जा--- शाणं बाळ तेऽ ! तुझ्या आई- बाबांना विचारून ये.'

' जा रे दीड शहाण्या, तूच विचारून ये'.

'हाऽहाऽहाऽ ! तुझी टोपी विदुषकासारखी दिसतीय्'

'शट अप !'

'हाऽऽहाऽऽऽ ! तू आता विदुषकासारखा दिसतो आहेस'.

'माझ्या टोपीला हात तरी लाव, तुझं कंबरडंच मोडतो.'

'शीः ! तुझ्या घाणेरडया टोपीलाच काय, पण तुझ्या कळकट अंगालाही स्पर्श करण्याची माझी इच्छा नाही. फक्त तुझी हाडं मात्र मी मऊ करणाराय्'.

' बघू या ना कोण कुणाची हाडं मऊ करतंय् ते.'

टॉमनं ते आव्हान स्वीकारलं आणि बुटाच्या टोकानं रस्त्यावर रेघ ओढत तो म्हणाला,

' हिंमत असेल, तर ही रेघ ओलांडून दाखव.'

पण टॉमचं वाक्य पुरं होतंय् न होतंय् तोच त्या मुलाने धडक मारलीच.

एकमेकांचा उध्दार करत दोघंही परस्परांवर अक्षरशः तुटून पडले. फिसकारणाऱ्या मांजराप्रमाणे दोघं एकमेकांचे वाभाडे काढत होते.

दोघांनी एकमेकांचे केस ओढले. नाकावर बुक्कया मारल्या. कान उपटले. एकमेकांच्या तोंडाला चिखल फासला .

आपला शत्रू दगड उचलतोय् असं पाहिल्यावर मात्र टॉमनं त्याला रस्त्यावरच आडवा करून पिंजून काढलं. शेवटी टॉमला शिव्या घालत त्यानं पळ काढला.

स्वतःच्या फाटक्या कपडयाकडं नजर टाकत टॉम ओरडला,

'उद्या तुझं चंदन करतो लेका !'

पण त्यादिवशी पॉली मावशी कडून टॉमचंच चंदन होणार होतं.

टॉमच्या अंगावरील फाटके कपडे पॉली मावशीनं पाहिले मात्र, ती अशी काही भडकली की विचारूच नका. त्यातच आगीत तेल ओतायचं काम सिडनं अगदी झकास केलं.

मग काय विचारता ? टॉमला त्या रात्री झकासपैकी उपास घडला. मावशीचे रट्टे आणि रागावणं हाच काय तो खुराक. सिड मात्र फिदीफिदी हसत होता.

टॉम मनात म्हणाला, 'थांब, उद्या गंमत करतो तुझी.'

दुसरे दिवशी काय होणार याची टॉमला कल्पनाच नव्हती. पॉली मात्र बडबडतच होती,

'आईवेगळं पोर- म्हणून पदरात घेतलं, तर कारटं आता डोक्यावरच बसायला

लागलंय्.'

दुसऱ्या दिवशी सुट्टीचा दिवस होता. लख्ख आणि सुंदर. म्हणजे मित्रांबरोबर मस्ती करण्याचा दिवस. गवतात लोळण्याची सकाळ, नदीत पोहायची दुपार आणि मैदानात धुडगुस घालण्याची संध्याकाळ.

पण आज टॉमच्या नशीबात यातलं काहीच नव्हतं. पॉली मावशीनं भल्या पहाटे टॉमच्या कानाचा गड्डा पकडून त्याला उठवलं आणि त्याच्यासमोर रंगाची बादली आणि ब्रश टाकून म्हटलं,

'आज घराभोवती असलेलं सगळं लाकडी कंपाऊंड रंगव. दुपारपर्यंत हे काम झालं पाहिजे.'

बिचारा टॉम ! वाळलेल्या आणि सुकलेल्या चेहऱ्यानं त्यानं मुकाट्यानं रंगाची मोठी बादली उचलली आणि ब्रश घेऊन तो लाकडी कुंपणाजवळ आला.

एवढं मोठं कुंपण रंगवायचं म्हणजे मरणच.

अगदी नाईलाजानं टॉमनं बादलीत ब्रश बुडवला आणि मोठ्या कष्टानं दोन-चार फराटे समोरच्या लाकडावर ओढले.

मग पॉली मावशी आजुबाजूला नाही, याची खात्री करुन टॉम दगडावर बसला. एवढ्यात समोरुन त्याला जिम येतांना दिसला.

टॉमनं मनातल्या मनात टाळीच वाजवली.

आपल्या गळयातलं झंगट त्यानं जिमवर ढकलायच्या सगळ्या युक्त्या वापरुन पाहिल्या. पण काहीही उपयोग झाला नाही.

शेवटी टॉम म्हणाला,

'जिम, तुझ्या आवडीचे मासे मी तुला नदीवरून पकडून आणून देतो, मग तर झालं ?'

माशाचं नावं काढल्यावर जिम क्षणभर हलला. पण पुन्हा नकारार्थी मान हालवत म्हणाला,

'नाही- मला नाही जमायचं. मालकीणबाईंना हे कळलं, तर माझं कांडकंच पडेल. मी नाही रंगवणार हे कुंपण.'

आता टॉम अगदी हताश झाला.

अत्यंत निराशेनं त्यानं पुन्हा एकदा समोरच्या लाकडांवर फराटे मारायला सुरवात केली.

टॉमचं रस्त्यावर लक्ष होतंच. लांबून रस्त्यावरून डुलत डुलत येणाऱ्या बेन रॉजर्सला त्यानं पाहिलं आणि टॉम धसकलाच.

बेन रॉजर्सची फिरकी आपण अनेकदा ताणली आहे. आता तो आपल्याला घालून पाडून कुचकं बोलणार. टॉम अस्वस्थ झाला. आता काय करायचं ?

टॉमच्या डोक्यात एक अफलातून कल्पना आली.

बेन रॉजर्स जवळ आल्यावर टॉमनं कपांऊंड अगदी मनापासून रंगवत असल्याचा आव आणला. टॉमला कंपाऊंड रंगवताना पाहून बेन रॉजर्सला अक्षरशः हर्षवायू झाला.

'हाऽहाऽ ! टॉम, शेवटी मावशीनं तुला कामाला जुंपलं तर !'

टॉमनं बेनकडं अजिबात लक्ष दिलं नाही आणि रंगवण्याचं काम तसंच पुढं चालू ठेवलं.

'हाऽहाऽहाऽ !', बेन रॉजर्स खिदळला, ' टॉम, तू काहीही म्हण, आज तुझा प्रचंड वडा झालाय्.'

टॉमनं शांतपणे बेनकडं पाहिलं. मग तो म्हणाला,

'बेन, तू मूर्ख आहेस, असं आजपर्यंत मला वाटत होतं. आता मात्र खात्रीच झालीय् माझी.'

'क्- क्- काय झालं ?', बेननं चक्रावून विचारलं.

टॉमचं लक्ष बेन रॉजर्सच्या हातातल्या सफरचंदाकडं गेलं. त्या लालबुंद गोळ्यानं टॉमच्या तोंडाला पाणी सुटलं. आपल्याला भूक लागलीय् हे त्याला जाणवलं. तो म्हणाला,

' बेन, तू मूर्ख आहेस. आपल्या वयाच्या मुलाला इतकं जबाबदारीचं काम कधीतरी करायला मिळतं का ? हे काम करतांना मला आनंदाच्या उकळ्या फुटताहेत.'

टॉमच्या शब्दानं जादू केली. बेन रॉजर्स म्हणाला,

'टॉम, मला जरा वेळ रंगवू दे ना.'

टॉम कुत्सित हसून म्हणाला,

'सॉरी बेन, पण हे जमायचं नाही. हे लाकडी कंपाऊंड म्हणजे मावशीला जीव की प्राण. उगाचंच कुणावर तिनं हे काम सोपवलं नाहीय्'.

बेन रॉजर्स अजीजीनं म्हणाला,

'टॉम, मी अगदी जबाबदारीनं रंगवतो ना. हे बघ, मी तुला अर्ध सफरचंद देतो.'

तरीही टॉमनं नकारच दिला.

आता मात्र बेन रॉजर्स घाईला आला.

'टॉम, हे सगळं सफरचंद घे, पण मला रंगवू दे.'

वरवर नाराजी दाखवत तो म्हणाला,

'आता तुझा इतका आग्रहच असेल, तर--- घे हा ब्रश. पण सांभाळ. काम उत्तम झालं पाहिजे.'

बेन रॉजर्स घाम गाळत रंगवायला लागल्यावर, टॉमनं एका झाडाखाली आरामशीर बैठक मारली आणि आरामात तो सफरचंद खायला लागला.

बेन रॉजर्सला काम करतांना पाहून - म्हणजे अशी संधी मिळालेली पाहून- त्याचे मित्रही गोळा झाले. त्यांनाही थोडा वेळ रंगवायची संधी हवी होती.

जॉनी मिलरनं मेलेला उंदीर देण्याचं वचन दिल्यावरच टॉमनं त्याला संधी दिली. कारण उंदराच्या शेपटीला दोरी बांधून तो गरागरा फिरवल्यावर आणि मित्रांना घाबरवल्यावर किती गंमत येईल, याचं चित्र टॉमच्या डोळयापुढं उभं राहिलं होतं.

दुपारी चार वाजेपर्यंत टॉमजवळ अशा अनेक वस्तू जमा झाल्या. टॉम झाडाखाली आरामात बसला होता आणि लाकडी कंपाऊड रंगवून पूर्ण झाल्याचं त्यानं पाहिलं. एक नव्हे, दोन नव्हे, तर रंगाचे तीन हात दिलेलं ते कंपाऊंड नवं कोरं दिसायला लागलं.

टॉमच्या लक्षात एक गोष्ट आलेली होतीच. दुसऱ्याकडून काम करून घ्यायचं असेल तर ते काम अवघड आहे, दुसऱ्याला जमणार नाही अशीच भूमिका घ्यायची. म्हणजे आपोआप ते आव्हान कुणी ना कुणी तरी स्वीकारतंच. बेन रॉजर्सचं काय झालं ?

दुपारी चारनंतर पॉली मावशी बाहेर आली. टॉमचा आपण कसा पिट्टा पाडला, त्याची कशी जिरवली, या आनंदात ती होती.

टॉम शीळ घालत झाडाखाली बसला आहे, हे बघून तिच्या तळपायाची आग मस्तकाला गेली.

एवढ्यात तिचं लक्ष कंपाऊंडकडं गेल. नवीन रंगात झळाळणारं ते कंपाऊंड बघून पॉलीला चक्करच आली.

आश्चर्यानं तिचे डोळे आणि जबडाही रुंदावला !

टॉमनं पॉली मावशीपुढं रंगाची रिकामी बादली आदळली आणि तिला 'टाऽटाऽ' करुन तो खेळण्यासाठी सुसाट सुटला.

बराच वेळ हुंदडल्यावर टॉम जेफ थॅचरच्या घरावरून रमत-गमत जात होता. अचानक एका सुंदर मुलीनं त्याचं लक्ष वेधून घेतलं.

तिचे डोळे निळे होते. केस सोनेरी आणि गाल कसे गोबरे- गोबरे !

आपल्या वर्गातील ॲमी लॉरेन्सला टॉम आत्तापर्यंत सुंदर समजत असे. पण या देखण्या मुलीपुढं ती काहीच नव्हतं.

त्या मुलीचं आपल्याकडं लक्ष जावं म्हणून टॉमनं सगळ्या युक्त्या करुन पाहिल्या. शेवटी त्या मुलीचं टॉमकडं लक्ष गेलं.

आपल्या हातातलं फूल तिनं कुंपणावरुन टॉमकडं फेकलं.

टॉमला धन्य- धन्य झालं. आता ॲमी लॉरेन्सला कोण विचारतो ?

टॉमनं फुलाचा वास घेतला आणि ते फूल आपल्या हृदयाशी धरलं.

खरं तर त्यानं ते फूल पोटाजवळच धरलं होतं. कारण शरीरात हृदय नेमकं कुठं असतं, हे त्याला तरी कुठं माहीत होतं ?

***

२८९६ 9|9|८8

## २. चर्चमधला गोंधळ

दुसऱ्या दिवशी रविवार होता.

पण आज टॉमला हुंदडता येणं अशक्य होतं

कारण आज 'संडे स्कूल' होतं. प्रार्थनेसाठी चर्चमधे जावंच लागणार होतं.

टॉमचं काहीच पाठांतर नव्हतं. सिडनं मात्र त्याचा अभ्यास पूर्ण केला होता. टॉमची चुलत बहिण मारिया हिनंही सगळं पाठांतर चोख केलं होतं.

टॉमचा मात्र सगळाच आनंद होता !

टॉमनं पोषाख मात्र खास ठेवणीतला केला होता. पॉली मावशीकडून मिळालेला सर्वोत्तम सूट त्यानं घातला होता. पॉलीश केलेले बूट पायात चढवून टॉम निघाला.

बरोबर त्याच्यावर नजर ठेवायला सिड आणि मारिया होतेच. टॉमला त्यांची काळजी नव्हती. कारण त्या दोघांना अगदी सहज गुंगारा देता येईल, अशी त्याची खात्री होती.

नऊ ते साडेदहापर्यंत शाळेचा कार्यक्रम झाला. मग चर्चमधे जायचं होतं.

आता टॉमनं एक गंमत केली. आपल्या मित्राला ज्येष्ठमध आणि मासेमारीचा हुक देऊन टॉमनं त्याच्याकडून एक पिवळं तिकिट मिळवलं. ते पिवळं तिकिट काय धमाल करणार आहे, हे फक्त टॉमलाच माहीत होतं.

चर्चमधे जाताना या पिवळया तिकिटाला अतिशय महत्व होतं. कारण बायबल मधील दोन मंत्र पाठ असले की एक निळं तिकिट मिळायचं. दहा निळी तिकिटं मिळाली की एक लाल तिकिट मिळायचं. आणि अशा दहा लाल तिकिटांच्या

बदल्यात एक पिवळं तिकिट मिळत असे.

हे काम भलतंच अवघड होतं. कारण ज्याच्याजवळ पिवळं तिकिट आहे, त्याला बायबलमधील किमान दोनशे मंत्र पाठ आहेत, असा स्पष्ट अर्थ होत होता.

टॉम पाठांतराच्या भानगडीत कधी पडला नाही. पिवळी तिकिटं मिळवण्याचे अन्य मार्ग त्याला माहीत होते. आता त्याच्याजवळ भरपूर तिकिटं जमली होती.

सगळेजण चर्चमधे जमल्यावर नेहमीप्रमाणं आपली लवकरच सुटका होईल, असं टॉमला वाटत होतं.

पण आज काही वेगळंच घडलं.

अचानक थॅचर कुटुंब चर्चमधे दाखल झालं. वैतागानं टॉम शिवी देणार होता, पण त्याच्या ओठावरच शब्द थांबले. कारण थॅचर बाईंचं बोट धरून ती कालचीच सुंदर मुलगी चर्चमधे आली होती.

तेच निळे डोळे, सोनेरी केस आणि गोबरे गाल. थॅचर यांच्याबरोबर आणखीही एक वयानं मोठे गृहस्थ होते. टॉमनं त्यांच्याकडं कुतुहलानं पाहिलं. ते 'काउंटी जज्ज' होते. खेडेगावात इतका मोठा मनुष्य म्हणजे काय थट्टा आहे !

'संडे स्कूल' चे शिक्षक वॉल्टर्स तर पार गडबडून गेले. काय करावं, हेच त्यांना सुचेना. गोंधळून जाऊन मुलांना ते उगाचंच 'लेफ्ट- राईट' एवढंच म्हणत राहिले.

मुलांवर वारंवार खेकसणाऱ्या शिक्षिका आता अगदी लाडात येऊन विद्यार्थ्यांबरोबर गोड बोलायला लागल्या. कधी नव्हे तो तिरळा ग्रंथपालही आपल्याकडं काउंटी जज्जनं बघावं म्हणून डोळे फिरवायला लागला.

पध्दत अशी होती, की ज्याच्याजवळ दहा पिवळी तिकिटं आहेत, त्याला सन्माननीय पाहुण्यांच्या हस्ते बायबलची एक प्रत फुकट भेट मिळत असे.

वॉल्टर्स गोंधळले होते. त्यामुळं कुठल्या मुलाला बायबत द्यायचं, हे काही त्यांच्या लक्षात येत नव्हतं.

कुणी चांगल्या मुलानं हात वर करावा, म्हणून वॉल्टर्स स्वत:चेच हात हवेत फेकायला लागले. अनेक मुलांकडं तिकिटं होती. पण बायबल मिळवण्याएवढी नव्हती.

टॉम स्वत:शीच हसला. स्वत:जवळ पुरेशी तिकिटं आहेत, याची खात्री केल्यावरच तो उठला आणि वॉल्टर्स यांच्यापुढं येऊन उभा राहिला.

वॉल्टर्सना चक्कर यायची, काय ती बाकी राहिली. टॉमसारख्या उडाणटप्पू

मुलाजवळ दहा तिकिटं ? अशक्यच.

पण टॉमनं खिशातून तिकिटं काढून वॉल्टर्स यांच्यापुढं धरली. त्यात नऊ पिवळी, नऊ लाल आणि दहा निळी--- म्हणजे एकूण दहा पिवळी तिकिटं होती.

वॉल्टर्स यांचा नाईलाज झाला. त्यांनी टॉमला जज्जपुढं उभं केलं. जज्जनी टॉमची पाठ थोपटून त्याला बायबलची प्रत भेट दिली. आणि म्हटलं,

'शाब्बास पोरा ! कमालच केलीस.'

मग जज्जनी नेहमीच्या पध्दतीनं लांबलचक कंटाळवाणं आणि प्रौढ भाषण केलं. टॉमच्या भाषेत- ठोकलं. कुणाचं लक्ष नाही, असं पाहून टॉमनं कचकचीत तेरा जांभया दिल्या. बायबलचं महत्व सांगून संपलं.

शेवटी जज्जनी टॉमला विचारलं,

'हां, तर टॉम, मला येशूच्या प्रमुख बारा शिष्यांपैकी दोघांची नावं सांग पाहू.'

स्तब्ध शांतता !

टॉमला तरी ही नावं कुठं माहीत होती ?

वॉल्टर्स यांचा श्वास थांबला. कारटं आपली आज अगदी लाज काढणार ! वरवर मात्र अगदी स्मित करत वॉल्टर्स म्हणाले,

'टॉम, घाबरु नकोस हं. सांग बरं दोन्ही नावं.'

टॉम मनाशी म्हणाला, 'तुझ्या बापालाही मी भीत नाही लेका. पण मला कुठं उत्तर माहीतंय् ?'

एक शिक्षिका भाव खाण्यासाठी पुढं येऊन म्हणाली,

'टॉम अगदी हुशार मुलगा आहे. तो नक्कीच उत्तर देणार. हो की नाही रे टॉम ?'

टॉमला वाटलं- बरी संधी आलीय् या बाईची चांगली टर उडवण्याची !

त्यानं शांतपणे सांगितलं,

'डेव्हिड आणि गोलिएथ.'

वॉल्टर्स यांच्या छातीत कळ आली. बाईंना भोवळ आली. दोघांनाही वाटलं की चर्च कोसळून आपल्या डोक्यावर पडेल, तर किती बरं होईल !

तेवढ्यात प्रवचनाची वेळ झाली आणि त्या अवघड क्षणातून सगळेच सुटले.

पुन्हा एकदा कंटाळवाण्या कार्यक्रमाला सुरवात झाली. आता चर्चचधे खेड्यातली सगळीच मंडळी उपस्थित होती. अगदी पॉली मावशीही.

त्यामुळं टॉमची भलतीच पंचाईत झाली. त्याला जांभई देण्याचीही चोरी झाली.

वास्तविक प्रार्थना झाल्यावर सर्व लहान मुलांना सोडून द्यायला पाहीजे होते. परंतु नंतर सुरू झाले पाद्रीबुवांचे प्रवचन. त्यांनी अतिशय अवघड भाषेत बायबलमधील वचनांचा अर्थ सांगायला सुरवात केली.

मुलांच्या एकमेकांकडे बघून खुणा सुरू झाल्या. पालक उपस्थित असल्यामुळं त्यांना काही करता येईना.

सहनशक्तीचा अगदी अंत झाल्यावर टॉमनं खिशातून एक काडेपेटी हळूच बाहेर काढली आणि कानाशी धरली.

आत वळवळणाऱ्या किड्याचा आवाज त्याला स्पष्ट ऐकू येत होता.

आत होती एक गोचीड ! टॉमनं तिला चिमटीत पकडली आणि हळूच जमिनीवर सोडून दिली.

चर्चच्या आवारात एक कुत्रं राहात होतं. लांब शेपटीचं आणि केसाळ अंगाचं. त्याला गोचिडीचा बरोब्बर वास आला.

त्याक्षणी चित्रविचित्र आवाज करत ते चर्चमधे घुसलं. प्रवचन करणारा पाद्री त्याच्या दर्शनानं एकदम उडालाच.

कुत्रं आलं, ते नेमकं गोचिडीच्या अंगावर जाऊन बसलं. गोचिडीनं त्याचा कडकडून चावा घेतला. त्याबरोबर केकाटत ते कुत्रं माणसांच्या मधून धावत सुटलं. ते आपल्याला चावू नये म्हणून लोकही पळत सुटले. एकच कल्लोळ झाला. कोण पडलं, कोण आपटलं, कुणाचे कपडे फाटले. पॉली मावशीचा चष्माच हरवला ! पाद्रीचा झगा अदृश्य !

असं प्रवचन जन्मात ऐकलं नाही असं टॉम अजूनही शपथेवर सांगतो !

***

बाल वाङ्मय विभाग
क्र. २८९९ दिनांक 9/9/K8
विषय

## ३. स्मशानातलं धाडस

सोमवार उजाडला.

खरं तर तो कधीही उजाडू नये असंच टॉमला वाटायचं. कारण सोमवार उजाडला की शाळा सुरू. टॉमला शाळेचा भयानक कंटाळा होता.

अंथरुणात जाग आल्यावर शाळेच्या कल्पनेनं टॉमच्या अंगावर काटा उभा राहिला.

शाळा बुडवण्यासाठी काय बरं करावं ?

पोटदुखी-- डोकेदुखी--- पण या सगळ्या युक्त्या पूर्वी एकदा वापरुन झाल्या आहेत. पॉली मावशीला या सगळ्या युक्त्या माहीत आहेत.

पोटदुखी वगैरे म्हटलं तर चांगलं रेचक घ्यावं लागेल. नकोच ते.

टॉमच्या लक्षात आलं. त्याचा एक दात हलत होता. अरे- हे आपल्या पूर्वीच लक्षात यायला हवं होतं.

दातदुखीचं नाटक काय झकास करता येईल.

टॉमनं बाजूला पाहिलं. शेजारी सिड झोपला होता. टॉमनं क्षणभर विचार केला आणि एक भयानक किंकाळी फोडली.

टॉमचा आवाज असा भयंकर होता की सिड गादीतच उडाला. पॉली मावशीनंही धाव घेतली.

टॉमच्या नाटकावर तिचा विश्र्वास नव्हता.

'कारट्या आज आता हे नवीन काय काढलंस ?', ती किंचाळली.

भयानक वेदना होत असल्यासारखा चेहरा करुन टॉम गडबडा लोळू लागला.

सिड आणि पॉली मावशी यांना घाबरं केल्यावर तो म्हणाला,

'माझा हा हलणारा दात भयानक दुखतो आहे. आई गऽ-- मावशी गऽ-- वाचव मला---'

पॉली मावशीनं दोन्ही हात कमरेवर ठेवून म्हटलं,

'एवढंच ना ? मेल्या- मग अगोदर सांगायला काय झालं होतं ? उपटून काढते दात तुझा.'

दात काढायची पॉली मावशीची पध्दत जगावेगळी होती. तिनं चांगला चिवट खजुरी दोरा घेतला. त्याचं एक टोक टॉमच्या दाताला बांधलं. दुसरं कॉटच्या एका पायाला.

यापेक्षा आपण शाळेला गेलो असतो, तर बरं झालं असतं, असं टॉमला वाटायला लागलं.

पॉली मावशीनं एका तव्यात जळणारे निखारे घेतले आणि टॉमच्या दिशेनं मोहरा वळवला.

टॉमचे पाय लटपटले.

पॉली मावशीनं जळणाऱ्या निखाऱ्यांचा तवा टॉमच्या एकदम तोंडाजवळ नेला. घाबरलेल्या टॉमनं त्याचं तोंड एकदम मागं घेतलं. क्षणार्धात त्याचा हलणारा दात बाहेर आणि टॉम मागं असा प्रकार घडला.

कॉटला बांधलेल्या दोऱ्याला लोंबणारा टॉमचा दात बघून सिडनं आनंदानं उड्या मारल्या.

दात गेला तो गेलाच, वर शाळेला जायचं काही टळलं नाही.

पाठीवर दप्तर टाकून बिचारा टॉम निघाला.

दात पडलेल्या रिकाम्या जागेत त्याची जीभ वारंवार जात होती. अचानक टॉमच्या मनात एक कल्पना आली. दात पडलेल्या जागेतून त्यानं थुंकी उडवली.

स्वत:वरच तो खूष झाला. आपल्या कुठल्याच मित्राला हे जमणार नाही, याबद्दल त्याची खात्री होती.

टॉमच्या सुदैवानं म्हणा किंवा दुर्दैवानं- शाळेच्या वाटेवरच त्याला हक फीन भेटला. आता हक म्हणजे गावावरून ओवाळून टाकलेलं कारटं होतं.

सगळे शिक्षक- शिक्षिका त्याच्या नावानं बोटं मोडत असतं. मुलांना मात्र हक हा आपला नेता वाटे. अगदी टॉम सारखाच.

हे सगळं जग आपलंच आहे, अशी हकची समजूत होती. कुणाच्याही घराच्या पायरीवर तो अगदी आरामात झोपत असे. दुपारच्या मुक्कामाला त्याला रस्त्यावरचं कुठलंही पिंप चाले.

कुठंही गेला, तरी हक त्याच्या मर्जीप्रमाणं वागत असे.

अशा हकला बघितल्यावर टॉमचे डोळे लकाकले. हकच्या मागं नेलेल्या हातात काहीतरी होतं.

'हॅलोऽ हक, तुझ्या हातात काय आहे ?', टॉमनं विचारलं.

हकनं न बोलता हात पुढं केला. टॉम उडालाच. हकच्या हातात मेलेलं मांजर होतं.

'मेलेलं मांजर ? तू याचं काय करणार आहेस ?', टॉमनं आश्चर्यानं विचारलं.

'हॅऽ ! अगदी बावळट आहेस. हा काय प्रश्न झाला ?'

'का ?'

'टॉम, मेलेली मांजरं आपल्याजवळ असली की अंगावरच्या चामखिळी बऱ्या करता येतात.'

यावर टॉमला फारसं आश्चर्य वाटण्याचं कारणच नव्हतं. हक आणि टॉम-दोघंही एकमेकांचं बारसं जेवलेले होते.

तरी सुध्दा टॉम म्हणालाच,

'हक, एवढं मोठं मांजर मारायचं आणि काय बरी करायची, तर चामखीळ ! छे बुवा, आपल्याला हे मुळीच पटत नाही. आपण--- ऽ'

'मी काय म्हणतो, ते ऐक तरी ! हे मेलेलं मांजर मध्यरात्री स्मशानात न्यायचं. नुकतंच पुरलेल्या माणसाचं थडगं---

'प्रेताचं म्हण की !'

'तेच रे ! तर त्या थडग्यातून सैतान बाहेर येतो. तुला तो दिसणार नाही. पण त्याचा स्पर्श जाणवतो. पुरलेल्या माणसाला सैतानानं थडग्यातून बाहेर काढलं की आपण मेलेलं मांजर थडग्यावर फेकायचं आणि म्हणायचं, 'सैताना, या प्रेताला पकड. मांजरा, तू सैतानाला पकड आणि चामखिळी तू मांजराला पकड.' बस्स ! चामखीळ नाहीशी झाली म्हणूनच समज.'

'--- गंमतच आहे. पण हक, तू हा प्रयोग कधी केलेला आहेस काय ?'

'नाही. पण मला हॉकिन्सबाईनी सांगितलं हे.'

'कुणी ? हॉकिन्सबाईनी ? मग तू म्हणतोस त्यात तथ्य असलं पाहिजे. कारण हॉकिन्सबाई म्हणजे चेटकीणच आहे. पण हा प्रयोग तू केव्हा करणार आहेस ?'

'आजच रात्री. टॉम, तुला हूज विल्यम माहित आहे का ?'

'कोण विल्यम ? चागला ओळखतो मी त्याला. नतद्रष्ट आहे लेकाचा.'

'तो आजच खपला. आज त्याला पुरणार आहेत.'

'हक, मी सुध्दा तुझ्याबरोबर येऊ का ?'

'चल की लेका. परवानगी कशाला विचारतो ? पण स्मशानाला घाबरत नाहीस ना तू ? नाहीतर करशील माझी पंचाईत.'

टॉम गदगदून हसला. म्हणाला,

'तिथं म्हणे सगळी गंमतच असते.'

स्मशानात जाण्याचा दोघांचा कार्यक्रम नक्की झाला. पण शाळेला जायच्या अगोदर टॉमनं एक उपद्व्याप केलाच. पॉली मावशीनं उपटलेला दात हकला देऊन त्याच्या मोबदल्यात टॉमनं हकला जंगलात सापडलेलं नाणं मिळवलं.

--- रात्रीचे अकरा वाजले. घरातले सगळेजण झोपल्याची टॉमनं खात्री केली. एवढ्यात घराच्या लाकडी कुंपणावर बाटली आदळण्याचा आवाज आला. टॉमनं ओळखलं, हक आला.

टॉम पटकन् उठला. अर्ध्या मिनिटात त्यानं अंगावर कपडे चढवले आणि खिडकी उघडून तो हळूच बागेत उतरला. कंपाऊडजवळ हक त्याची वाट बघतच होता. त्याच्या हातात मेलेलं मांजर होतं.

अर्ध्या तासात दोघं स्मशानात पोचले. टॉमनं हकच्या पोटात हलकासा गुद्दा मारून विचारलं,

'तुला काय वाटतं ? आपण इथं आल्याचं सैतानाला आवडेल का ?'

'मला तरी काय ठाऊक ? पण हूज विल्यमचा आत्मा आपलं संभाषण नक्की ऐकत असणार.'

टॉमनं एकदम हकचा दंड पकडला. हकनं त्याच्याकडे चमकून बघितलं,

'घाबरलास काय बेट्या ?'

टॉम हलक्या आवाजात म्हणाला,

'शू ऽऽऽ ! बोलू नको.'

'का रे ? काय झालं ?'

'मला कोणाच्या तरी बोलण्याचा आवाज ऐकू येतोय्.'

टॉमचं म्हणणं बरोबर होतं. हकच्या कानावरही अस्पष्टसे शब्द आले.

'ते बघ. तिकडे बघ', टॉम हळूच कुजबुजला.

हकनं अंधारात रोखून बघितलं. तीन अस्पष्टशा छाया पुढे चालत येत होत्या. टॉम म्हणाला,

'धमाल आहे. आज आपल्याला सैतान बघायला मिळणार.'

'तू गाढव आहेस ?', हक म्हणाला, 'हे सैतानाचं बोलणं नाही. हा तर मफ पॉटरचा आवाज आहे.'

'हक तू म्हणतोस ते बरोबर आहे. दुसऱ्या माणसाचा आवाजही मी ओळखला. तो इन्जुन ज्यो आहे. म्हणजे एकवेळ सैतान परवडला. पण ज्यो नको.'

हळूहळू त्या व्यक्ती पुढं आल्या. एकाच्या हातामध्ये कंदील होता. तिसऱ्या माणसालाहि दोघांनी ओळखलं. ते होते डॉक्टर रॉबिन्सन.

डॉक्टरनी कंदील खाली ठेवला. झाडांच्या मुळावरच बैठक मारली आणि ज्योला फक्त खूण केली. ज्यो आणि पॉटर यांच्या हातात फावडी होती.

डॉक्टरनी दाखवलेल्या जागेवर दोघांनी खणण्यास सुरवात केली.

'ते बघ त्यांचं काय चाललंय् ते', टॉम हळूच कुजबुजला.

दोघंही जमिनीवरून सरकत पुढं निघाले. एका थडग्यावर उभारलेल्या दगडाआड दोघंही दडले. डॉक्टर रॉबिन्स त्यांच्यापासून अवघ्या दहा फुटांवर बसले होते.

इन्जुन ज्यो आणि मफ पॉटर यांचं जमीन खणण्याचं काम चालूच होतं. अर्धा तास फक्त फावड्यांचा आवाज येत होता.

अर्ध्या तासानंतर खणकन् आवाज आला. ज्योनं हातातलं फावडं बाजूला टाकलं आणि मफ पॉटरच्या मदतीनं त्यानं जमिनीतली पेटी बाहेर काढली.

हक आणि टॉम आऽ वासून बघत राहिले. कारण ती पेटी साधी नव्हती. ती शवपेटी होती.

पेटीतलं प्रेत ज्यो आणि मफ पॉटरनी बाहेर काढलं. एका ब्लँकेटमधे गुंडाळून जमिनीवर आदळलं. एका दोरीत घट्ट बांधलं.

ज्योनं मफला डोळा घातला. त्याबरोबर मफनं हात झटकले आणि डॉक्टरांच्याकडं वळून तो म्हणाला,

'डॉक्टर, निम्मं काम झालं. आता आम्हाला तुम्ही दुप्पट पैसे दिलेत, तरच पुढचं काम करू.'

डॉक्टरांच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटलं. तेवढ्यात ज्यो म्हणाला,

'मफ म्हणतोय् ते बरोबर आहे डॉक्टर. आता जर तुम्ही दुप्पट पैसे दिलेत तरच आम्ही पुढं काम करू.'

डॉक्टर संतापून म्हणाले,

'याचा अर्थ काय ? मी अगोदरच तुम्हाला म्हणाल तितके पैसे दिले आहेत. आता तुम्हाला एक छदामही मिळणार नाही.'

ज्यो खुनशीपणानं पुढं झाला. आणि दोन्ही हात कमरेवर ठेऊन डॉक्टरांना म्हणाला,

'डॉक्टर, आता मी काय म्हणतो ते ऐका. पाच वर्षापूर्वीची गोष्ट आहे. मी त्यावेळी अडचणीत होतो. पण त्यावेळी तुम्ही मला अन्न न देता घराबाहेर हकलून दिलंत. ती गोष्ट मी अजून विसरलो नाही. त्याचा सूड घेण्याची वेळ आज आली आहे.'

डॉक्टरही काही कमी नव्हते. ज्यो आपल्यावर हल्ला करणार हे त्यांच्या ध्यानात आल्याबरोबर एका ठोशासरशी त्यांनी त्याला खाली लोळवलं.

ज्यो खाली कोसळलेला बघून मफ पॉटर उसळला आणि डॉक्टरांच्या अंगावर धावून गेला. दोघांची लठ्ठालठ्ठी सुरू झाली. मफच्या अंगात ताकद असली तरी डॉक्टर चपळ होते.

यावेळी चिडलेला ज्यो उठून उभा राहिला आणि बाजूला पडलेला मफ पॉटरचा सुरा त्याने हातात घेतला. यावेळपर्यंत डॉक्टरनी टोले मारून मफला भुईसपाट केलं होतं.

हात झटकून डॉक्टर सरळ उभे होतात नं होतात तोच ज्योनं संधी साधली आणि दमलेल्या डॉक्टरांच्या छातीत सुरा खुपसून त्यांना संपवलं. एक भयानक किंकाळी फोडून डॉक्टर खाली कोसळले.

टॉम आणि हकचं पाणी पाणी झालं होतं. यावेळी चंद्रावर ढग आले होते. त्यामुळे वातावरण आणखीनच भयंकर झालं होतं. अंधाराचा फायदा घेऊन हक आणि टॉम निसटले.

तोपर्यंत ज्योनं गमंत केली. बाजूला पडलेला रक्ताळलेला सुरा त्यानं मफच्या

हातात ठेवला, मग तो शांतपणे बाजूला बसला. थोड्या वेळानंतर मार खाल्लेला मफ शुध्दीवर आला. किलकिल्या डोळ्यांनी त्यानं आजूबाजूला पाहिलं आणि तो पटकन् उठून बसला. डॉक्टरांच्या देहाकडे पाहून तो ओरडला,

'मॉय गॉड ! हे काय झालं ?'

'तू मूर्ख आहेस ?', ज्यो त्याला म्हणाला, 'तू डॉक्टरला कशासाठी ठार मारलंस ?'

मफच्या पायातली ताकदच गेली.

'काय ?', तो किंचाळला, 'मी मारलं डॉक्टरांना ?--- शक्यच नाही--- मला थोडी जास्तच झाली होती--- पण मी--- ?'

'होय ! तूच अघोरी कृत्य केलस हे', ज्यो किंचाळला.

मफच्या पायातली आता ताकदच गेली. तो खाली कोसळला आणि गयावया करत म्हणाला,

'ज्यो ! आपण चांगले मित्र आहोत. तू मला धोका देऊ नकोस. तू माझं नाव पोलिसांना सांगू नकोस.'

'ठीक आहे', ज्यो खुनशीपणाने म्हणाला.

'ज्यो ! तुझे उपकार मी आयुष्यात विसरणार नाही', मफ म्हणाला.

'तर मग आता तुझा जीव वाचवण्यासाठी पळ', ज्यो ओरडला.

त्या एका क्षणाचा मफला आधार मिळाला आणि तो अंधारात सुसाट धावत सुटला.

ज्यो खो खो हसत सुटला आणि म्हणाला,

'काय मूर्ख मनुष्य आहे हा ! जाताना सुरा सुध्दा घेऊन गेला नाही आणि आता सुरा घेण्यासाठी इथं परत येण्याची त्याची ताकद नाही.'

पण ज्योला हे माहीत नव्हतं की त्याचं भयानक कृत्य टॉम आणि हकनं प्रत्यक्ष डोळ्यानी पाहिलं होतं.

***

# ४. नदीवरचे चाचे

धापा टाकत टॉम आणि हक गावात परतले. त्यांनी जे पाहिलं होतं, ते भयंकरच होतं.

'हक, आता काय करायचं रे ?', टॉमनं विचारलं.

'जर डॉक्टर रॉबिन्सन मेले असले, तर ज्योला फाशीची शिक्षा होईल. दुसरं काय होणार ?', हक म्हणाला.

'पण आपण पोलिसांना काय सांगायचं ?'

हकनं टॉमकडं चमत्कारिक नजरेनं पाहिलं.

'तू काय वेडा आहेस का टॉम ? समज, ज्योला शिक्षा झाली आणि तो सुटला, तर आपलं काय होईल ? आपल्याला काकडीसारखं चिरून टाकेल ज्यो ! तेव्हा हे प्रकरण आपण विसरून गेलो, तरच उत्तम !'

टॉम सहमत झाला.

त्यानं एक लाकडी फळी घेतली आणि खिशातल्या खिळ्यानं त्यावर मजकूर कोरला,

'हक फिन आणि टॉम सॉयर हे रहस्य न फोडण्याची शपथ घेत आहेत.'

टॉमनं त्याच खिळ्यानं स्वतःच्या आणि हकच्या अंगठ्यातून रक्त काढलं आणि त्या रक्तानं दोघांनीही त्या प्रतिज्ञेखाली सही केली.

कसली ही वेडी पोरं म्हणायची---

--- दुसऱ्या दिवशी सगळं गाव हादरलं.

डॉक्टर रॉबिन्सन यांचा खून झाला होता. पोलिसांची धावपळ झाली. सगळं

गाव स्मशानाकडं लोटलं. शाळेला अर्धी सुट्टी देण्यात आली.

डॉक्टर रॉबिन्सन म्हणजे गावातली एक प्रतिष्ठित व्यक्ती होती. त्यांचा खून म्हणजे काही सामान्य गोष्ट नव्हती.

डॉक्टरांचा खून कोणी केला असावा ? कशासाठी केला असावा ? लोकांमधे उलट- सुलट चर्चा चालू होती. परंतु निश्चित अंदाज कोणालाच सांगता येत नव्हता. टॉम आणि हक यांच्या एवढ्याशा मनात चांगलीच खळबळ उडाली होती. पण दोघंही एकदम गप्प होते. फक्त काय होतं ते गुपचुप पहायचं त्यांनी ठरवलं होतं.

डॉक्टरांना पहाण्यासाठी लहान-मोठे, पुरूष-स्त्रिया, तरुण-वृध्द सारेजण स्मशानाकडं धावत होते. तिथं पोलीस येणार होते आणि तपास चालू होणार होता.

टॉम आणि हक दोघांना आता गप्प बसवेना. सारेजण स्मशानाकडं धावताहेत म्हटल्यावर हे दोघे थोडेच घरी बसणार ! शिवाय आता तिथं काय घडतं याची प्रचंड उत्सुकता त्या दोघांच्या मनात होतीच.

त्यामुळं ते दोघंही स्मशानाकडं गेले आणि स्मशानातल्या गर्दीत ज्योला बघून ते हादरलेच.

लोकांचा नुसता कलकलाट चालला होता. काही स्त्रिया तर भीतीनं पांढऱ्याफटक पडल्या होत्या.

टॉमनं हकला ढुसणी मारून म्हटलं,

'हक, ज्योला बघ. करून- सवरून पुन्हा तो नामानिराळाच.'

हकनं काहीच प्रतिक्रिया दाखवली नाही. उलट तो गर्दीत मिसळून गेला.

इतक्यात लोकांचा गलका आणखीनच वाढला. टॉमनं पाहिलं, तर पोलिसांनी मफ पॉटरला पकडून स्मशानात आणलं होतं.

टॉमला कळेना- खून तर ज्योनं केलाय्. मग मफला का बरं पकडलं आसावं ?

मफ आता एखाद्या लहान मुलासारखा रडत होता. दया मागत होता.

पोलीस त्याला फरपटत होते. मारत होते. डॉ. रॉबिन्सन यांचा खून ज्या जागेवर झाला, तिथं पोलिसांनी मफला आणलं. मफ पॉटर रडत- ओरडत होताच. मफचं लक्ष अचानक ज्योकडं गेलं.

पोलिसांना हिसका देऊन तो ज्योकडं धावला आणि ओरडला,

'ज्यो, तू तरी सांग. खरं सांग. तू सांगितलंस तरच पोलिसांना पटेल. बोल- बोल--- नाहीतर मी फासावर जाईन.'

इतका वेळ चाललेला गलका एकदम शांत झाला. मफच्या गुन्ह्याची माहिती इन्जुन ज्यो याला आहे, ही गोष्टच लोकांना गंमतशीर वाटली.

टॉम आणि हक प्रमाणंच अनेकांना ज्योची भीती वाटत होती.

मफ पॉटरची ज्योला दया आली नाही. पोलिसांना त्यानं उलटच सांगितलं,

'रात्री मला भटकायची सवय आहे. काल रात्री मी असाच स्मशानाच्या बाजूला भटकत आलो होतो. स्मशानातून मला भांडणाचे आवाज ऐकू आले. मला आश्चर्य वाटलं की इतक्या रात्री कोण भांडतंय् आणि ते ही स्मशानात.

'जवळ येऊन मी पाहतो तो मफ पॉटर आणि डॉक्टर रॉबिन्सन यांची हातघाईची जुंपली होती. एकमेकांवर दोघंही तुटून पडले होते. शेवटी मफ पॉटरनं आपला सुरा डॉक्टरांच्या छातीत खुपसला. डॉक्टर भयानक किंकाळी फोडून खाली पडले. मी घाबरून तिथून पळत सुटलो.'

सगळे लोक श्वास रोखून ऐकत होते. इन्जुन ज्योचं खोटं बोलणं ऐकून टॉम आणि हक गारीगार झाले. पोलिसांनी मफला कसं पकडलं, हे त्यांच्या लक्षात आलं.

ज्या सुऱ्यानं डॉ. रॉबिन्सन यांचा खून करण्यात आला होता, तो मफ पॉटरचा सुरा होता !

आणि तेवढ्या पुराव्यावर ज्योनं मफला पोलिसांच्या हातकडीत बरोबर अडकवलं होतं.

पोलिसांना खरी गोष्ट सांगण्याची खुमखुमी टॉमला आली होती. पण हकनं त्याला गप्प बसवलं.

पोलिसांनी मफला तुरूंगात डांबण्यासाठी फरपटत नेलं. मफचा धीर आता पूर्ण खचला होता. ज्योनं धोका दिला हे त्याच्या लक्षात आलं होतं.

स्मशानातली गर्दी हळुहळू पांगली.

टॉम आणि हक- दोघंही घराकडं जाण्यासाठी माघारी वळले. पण दोघांचेही पाय जडावले होते. मफवर अन्याय झाला आहे, हे दोघांनाही माहीत होतं.

अतिशय उदास मनानं टॉम घरी परतला. त्याला हा अनुभव नवा होता. कोणत्याही गोष्टीची त्याच्या मनाला कधीही रुखरुख लागून राहात नसे. पण आज काही वेगळं घडलं होतं.

रात्रभर तो अंथरुणावर तळमळत होता. जरा डुलकी लागली की त्याच्या डोळ्यापुढं हातात सुरा घेतलेला ज्यो उभा राहायचा. दचकून टॉम अंथरुणातच

उठून बसत असे.

केवळ दिवसच नव्हे, तर टॉमच्या रात्रीच्या रात्री भयंकर झाल्या.

पॉली मावशीकडं सिड तक्रार करायला लागला. एके दिवशी सिडनं पॉलीला सांगितलं,

'टॉम अलिकडं रात्री झोपतच नाही. मधेच किंचाळत उठतो.'

पॉली मावशीलाही कळेना की टॉमला नेमकं काय झालंय्.

मफ पॉटर आणि ज्यो- दोघांनी टॉमची झोप उडवली होतीच. आता टॉमवर आणखी एक संकट कोसळलं. झोप नीट नसल्यानं शाळेत त्याचं लक्ष लागेना. (नाहीतरी कधी होतं म्हणा ?)

टॉमच्या जीवनात आशेचा एकमेव किरण होता आणि तो म्हणजे बेकी थॅचरचा.

बेकी थॅचर ही टॉमची मैत्रीण झाली होती. ही टॉमशी नेहमीच चांगलं वागायची. टॉमला आवडलेली गोष्ट त्यानं मागितली तर पटकन् देऊन टाकत असे. टॉमच्या अभ्यासातही ती तिच्याकडून जमेल तेवढी मदत करत असे. टॉमला शिक्षा झाली तर तिलाच वाईट वाटायचं.

टॉम असा उदास असतो हे पाहून बेकी त्याच्याशी गप्पा मारायची, जोक सांगायची, त्याला हसवायची.

मात्र बेकीला असं वाटायचं की, टॉमनं फक्त आपल्याशीच बोलावं, हसावं.

ॲमी लॉरेन्स तर बेकीला अजिबात आवडत नसे. तिला कोणी चांगलं म्हटलं की बेकी जाम रागवायची. ॲमी वास्तविक चांगली मुलगी होती ! ती सर्वांशीच मोकळेपणानं बोलायची. पण ती फार शिष्ट आणि गर्विष्ठ आहे असं बेकीचं ठाम मत होतं.

आणि एक दिवस तिच्याशी बोलतांना टॉमनं चुकून ॲमी लॉरेन्सचा उल्लेख केला. झालं ! सगळाच घोटाळा झाला. बेकीचं नाक संतापानं लाल झालं. (अर्थात त्यामुळं ती अधिकच सुंदर दिसली, असं टॉमला वाटलं.)

ॲमीचा उल्लेख नको त्यावेळी करून आपण पस्तावलो आहोत, हे टॉमला कळलं. कारण त्या क्षणापासून बेकीनं टॉमशी बोलायचं बंद केलं. आणि पाय आपटत ती निघून गेली.

डॉक्टर रॉबिन्सनच्या भुतानं टॉमला अगोदरच छळलं होतं. आता बेकीनंही

कट्टी केल्यावर टॉम अगदीच उदास झाला.

त्याची तब्येतही खालावली. पॉली मावशी मात्र त्यामुळं भलतीच चिंतेत पडली. आपण टॉमला सारखं घालून- पाडून बोलल्यामुळंच हे असं झालं, असं तिला वाटायला लागलं. झालं ! पॉलीनं टॉमवर वात्सल्याचा वर्षाव करायला सुरवात केली.

हे काय गौडबंगाल आहे, याचा उलगडा टॉमला होईना. तो अधिकच गोंधळला. शेवटी मोठी माणसं ही अशीच विसंगत वागतात, हे त्यानं गृहीत धरलं, त्यावेळी त्याच्या मनाला जरा शांती मिळाली.

बेकीनं दिलेल्या धक्क्यातून सावरल्यावर टॉमनं पुन्हा हिंडाफिरायला सुरवात केली खरी, पण त्याला आता सगळं व्यर्थ वाटत होतं.

इतके दिवस टॉम व्रात्यपणा करायचा.पण त्यात 'जशास तसं' एवढीच भूमिका असायची. डॉक्टरांचा मृत्यू जेव्हा त्यानं प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला तेव्हा तो हादरलाच.

मोठी माणसं इतकं वाईट, दुष्ट वागू शकतात हे त्यानं पाहिलं होतं. असं का घडलं हे त्याला माहीत नव्हतं आणि जे घडलं ते तो पोलिसांना सांगूही शकत नव्हता.

आधीच त्याला शाळेत जायचा फार उत्साह. आता तर तो दिवसभर विचार करत इकडे- तिकडे हिंडत बसायचा. आपण नक्की कसं वागायचं, काय करायचं या विचारांनी त्याच्या इवल्याशा मेंदूत प्रचंड खळबळ उडाली होती.

शाळेतले मित्र भेटले तर त्यांच्याबरोबर शाळेत जावं लागेल म्हणून तो शक्यतो त्यांना टाळायचा. अगदीच कुणी भेटला तर उडवा-उडवीची उत्तरं देऊन पुढं निघून जायचा. त्याला कोणाशी खेळावं, बोलावं असं वाटायचंच नाही.

अशा विमनस्क अवस्थेत तो हिंडत असतांना त्याला हार्पर भेटला. त्याचा शाळेतला मित्र.

हार्परही अशा निराश मनःस्थितीत हिंडत होता. घरातल्या काही किरकोळ भांडणामुळं तोही दिशाहीन होता.

'हार्पर, आपल्या या नेहमीच्या आयुष्याला तसा काहीच अर्थ नाही. काहीतरी नवीन- धाडसी केलं पाहिजे', टॉम म्हणाला.

'मस्त कल्पना आहे टॉम, पण काय करायचं ?', हार्परनं डोकं खाजवत प्रश्न

विचारला.

टॉमनं चुटकी वाचवली आणि टुणकन् उडी मारून तो म्हणाला,

'सुचली. मला एक अफलातून कल्पना सुचली. हार्पर आपण चाचेगिरी करू या.'

हार्परचा चेहरा गोंधळला. तो म्हणाला,

'चाचेगिरी ? म्हणजे काय ?'

त्याचा तो प्रश्न ऐकून टॉम पोट धरधरून हसला. इतका की त्याच्या डोळयातून पाणी आणि पोटातून कळा येऊ लागल्या.

'हॅट लेका. अगदीच बावळट आहेस तू ! कुक्कुलं बाळच बघ. चाचा म्हणजे समुद्रावरचा दरोडेखोर. आपण चाचेगिरी करायची. कळलं ?'

'पण आपल्या गावाजवळ समुद्र कुठाय् ?', हार्परनं गोंधळून विचारलं.

'नदी तर आहे ना ! मग झालं तर !'

हार्परनं मान डोलावून म्हटलं,

'फॅन्टॅस्टिक कल्पना आहे. पण टॉम, आपण आपल्या चाचेगिरीत हक फीनला सहभागी करून घेऊन या. चालेल ?'

हक काय ? या गोष्टीला एका पायावर तयार झाला आणि तिन्ही कारट्यांनी एक दिवस घरातून पळ काढला. मासे पकडायचा गळ, तवा, काड्यापेटी अशा जुजबी वस्तू त्यांनी बरोबर घेतल्या होत्या.

नदीकाठावरचा एक तराफा पळवून त्यांनी पलिकडं बेटासारखी जागा होती, ती गाठली. अतिशय आनंदानं. आपण केवढा पराक्रम करतो आहोत, या कल्पनेनं त्यांची छाती भरून आली होती.

उघड्या तराफ्यावरून केलेला नदीच्या पाण्यातील प्रवास, तळपता सूर्य, भणभणतं वारं- तिघांनाही उगाचच वाटत होतं की त्यांनी काही नवीन मिळवलं आहे.

बेटावर पोचल्यावर तिघांनीही आपापली नावं पार बदलून टाकली. आणि तेही उघडच होतं म्हणा. चाचेगिरी करायची म्हणजे टॉम, हार्पर, हक असली मिळमिळीत नावं काय कामाची ?

टॉम झाला, 'दि ब्लॅक ॲव्हेंजर,' हक झाला 'दि रेड हँडेड' आणि हार्परनं तर 'दि टेरर ऑफ दि सीज्' हे नाव धारण केलं.

अभ्यासाची कटकट मागं नसल्यामुळं दुपारची झोपही अगदी गरगरीत झाली.

संध्याकाळी मासेमारी आणि रात्री शेकोटीचा कार्यक्रम असा दिवस झकास गेला. दिवसभराच्या श्रमामुळे तिघंही गाढ झोपले. त्या रात्री टॉमच्या स्वप्नात कोणीच आले नाही. बहुधा ज्यो आणि मफ पॉटरही झोपले असावेत.

सकाळी टॉमला प्रथम जाग आली. आपण कुठे आहोत हेच त्याला कळेना. मग त्याला सगळा प्रताप आठवला. त्यानं आपल्या मित्रांना उठवलं आणि आपल्या पराक्रमाची फुशारकी मारत तिघेही खिदळत बसले.

अचानक त्यांच्या कानावर काही आवाज आला. हार्परनं दचकून विचारलं,

'कोणाचा रे आवाज हा ?'

टॉम आणि हकनं कान देऊन ऐकलं.

'बहुधा मोटारबोटीचा आवाज आहे हा', टॉम म्हणाला, 'आपल्याला पुढं जाऊनच बघितलं पाहिजे.'

जॅक्सन बेटावरील झाडीतून बाहेर पडून तिघांनीही दूरवर दिसणाऱ्या आपल्या खेड्याकडं पाहिलं. नदीतून एक मोटारबोट फिरत होती. बोटीतली माणसं पाण्यात काहीतरी शोधत होती. मग टॉम किंचाळला,

'कोणीतरी बुडलेलं दिसतय्. सगळेजण पाण्यात शोध घेताहेत.'

काही क्षण शांततेत गेले आणि टॉमच्या डोक्यात लख्ख उजेड पडला. त्यांचा लाकडी तराफा पाण्यावरून वहात गेला होता आणि ही तिन्ही मुलं नदीत बुडाली असं समजून त्यांचा शोध चाललेला होता.

टॉम हकला म्हणाला,

'हक, ते आपलाच शोध घेताहेत. त्यांना वाटतंय् की आपण बुडून मेलो.'

तो दिवस त्या तिघांनाहि वाईट गेला. रात्र झाल्यावर हक आणि हार्पर दोघेहि गाढ झोपी गेले.

टॉमला मात्र झोप येत नव्हती. त्याच्या चाचेगिरीचा रंग आता उतरायला लागला होता.

तो हळूच उठला आणि सगळी नदी पोहून त्यानं आपलं गाव गाठलं. मागच्या दारानं तो हळूच आपल्या घरात शिरला आणि पलंगाखाली जाऊन लपला.

पॉलीमावशी, सिड, मारिया आणि हार्परची आई चौघेही कपाळाला हात लावून बसले होते.

पॉली मावशी हार्परच्या आईला सांगत होती,

'खर सांगू का, टॉम काही तसा वाईट मुलगा नाही. थोडासा खट्याळ आणि बेजबाबदार होता. पण अंतःकरणानं फार चांगला हो ! असा मुलगा लाखात सापडायचा नाही.'

हार्परच्या आईनं मान डोलावली आणि म्हटलं,

'मला का माहीत नाही ते ? माझा मुलगाही असाच आहे.'

पॉली मावशीनं आपले डोळरुमालानं टिपले. सिड म्हणाला,

'टॉमचं काय बरंवाईट झालंय् कुणास ठाऊक.'

पॉलीनं सिडच्या पाठीत धपाटा घातला. आणि किंचाळली,

'कारट्या ! जरा चांगलं बोल की रे ! आता टॉमबद्दल एक शब्द वाईट बोलशील तर तापलेल्या पळीचा चटका देईन बघ तुला.'

सिड चुप बसला. टॉमला मात्र पलंगाखाली आनंदाच्या उकळ्या फुटल्या. येणारं हसू त्यानं दोन्ही हात तोंडावर घट्ट धरून आवरलं.

आपल्याबद्दल पॉलीचं मत फारसं वाईट नाही, हे पाहून त्याला बरं वाटलं.

दिवाणखान्यातली मंडळी पांगल्यावर टॉमही चोरपावलांनी मागच्या दारानं बाहेर पडला. रात्री पुन्हा एकदा पोहून नदी पार करायचं त्याच्या जिवावर आलं होतं.

पण हार्पर आणि हक यांना जाग येण्यापूर्वी जॅक्सन बेटावर परतायलाच हवं होतं.

सुदैवानं हवेत थंडी नव्हती. त्यामुळं टॉमला फारसा त्रास झाला नाही. जॅक्सन बेटावर टॉम पोचला, त्यावेळी झुंजुमुंजू झालं होतं.

टॉमचे मित्र जागे झाले होते आणि कपाळाला हात लावून बसले होते. त्यांना वाटलं होतं की चाचेगिरीच्या आयुष्याला एका दिवसातच कंटाळून टॉम पळून गेला.

टॉम परत आलेला बघून दोघानीही उड्या मारल्या.

'कुठं गेला होतास ?', हक ओरडला.

'कुठं कडमडला होतास ?', हार्पर खेकसला.

हातांनीच खूण करत टॉमनं त्यांना खाली बसवलं आणि त्याच्या धाडसी प्रवासाचा सगळा वृत्तांत आपल्या मित्रांच्या कानावर तिखट-मीठ लावून , रंगवून सांगितला.

आईचा उल्लेख झाल्यावर हार्पर आत कुठंतरी कलबलला. चाचेगिरीची तिघांचीही धुंदी आता बरीचशी उतरली होती.

आणखी काही तास कसेबसे गेले असतील तेवढेच. हार्परनं अचानक घोषणा केली,

'बस्स झालं ! असल्या आयुष्याचा मला कंटाळा आला. मी आता घरी जाणार.'

'हॅट ! काहीतरी काय बोलतोस मुलीसारखं ?', टॉम ओरडला, 'आणखी काही दिवस असेच जाऊ देत. म्हणजे आपलं थोरपण आपल्या घरच्या सगळ्या लोकांना कळेल.'

'आपल्याला हे थोरपण परवडायचं नाही रे बाबा ! मी आता परत जाणार !', हार्परनं पुन्हा एकदा दृढ स्वरात सांगितलं.

हकनं हार्परची टर उडवायला सुरवात केली. तो म्हणाला,

'अयाई ! माझं कुक्कुलं बाळ ते. दुधाची बाटली हवीय् का माझ्या बाळाला ?'

तरीही हार्परचा निश्चय बदलला नाही.

मग टॉम म्हणाला,

'हे बघ हार्पर, आम्ही तुला खूप गंमतशीर गोष्टी दाखवू. आज आपण खूप मासे पकडू या. तुला सापाची अंडी दाखवतो. मग तर झालं ?'

छे !काय वाट्टेल ते झालं तरी हार्परचं म्हणणं एकच- 'मी घरी जाणार.'

हार्परच्या या निश्चयानं हकही पळवाट शोधायला लागला. मग बिचारा एकटा टॉम तरी काय करणार ?

दोन दिवस मिळेल ते खाल्ल्यामुळं हकची आणि हार्परचीही तब्येत बिघडली. हकच्या पोटात कळ आली आणि 'टॉम' अशी आरोळी ठोकून तो झाडीत पळाला.

तरीही जॅक्सन बेटाला रामराम ठोकण्यापूर्वी सगळ्यांनी मिळून कासवाच्या अंड्याचं भोजन केलं आणि नंतर एकही दरोडा न घातलेले हे चाचे नाईलाजानं पुन्हा एकदा आपल्या गावाकडं वळले.

***

२८९६ ११।९।८४

## ५. डॉबिन्सची फजिती

रविवार उजाडला.

प्रथेप्रमाणं 'संडे स्कूल' पार पडल्यावर चर्चमधल्या घंटा वाजायला लागल्या. सगळ्या गावात आज अतिशय गंभीर वातावरण होतं.

टॉम, हक आणि हार्पर यांचे देह सुध्दा नदीत न मिळाल्यानं तिघंही मृत्यू पावले, अशी सगळ्यांची खात्रीच झाली होती.

आणि तिघांच्या आत्म्यांना शांती मिळावी, म्हणून आज चर्चमध्ये प्रार्थना म्हटली जाणार होती.

बिचारी पॉली मावशी वारंवार डोळे टिपत होती. चर्चमधलं वातावरण अतिशय गंभीर होतं. गावातले लोक सहानुभूती व्यक्त करत होते. काहीजण तर गहिवरून रडत होते.

पाद्रीबुवांनी बायबल उघडलं.

इतक्यात चर्चच्या दाराशी आवाज आला. एवढ्या शांततेत कुणाची गडबड चालू आहे, हे पाहण्यासाठी पाद्रीबुवांनी वर पाहिलं.

भीतीनं त्यांनी किंकाळी फोडली.

त्यांच्या हातातलं बायबल गळून खाली पडलं. सगळं चर्च हादरलं--- सगळ्यांनी मागं वळून पाहिलं.

विजयी मुद्रेनं टॉम आपल्या सहकाऱ्यांबरोबर चर्चमधे येत होता. आश्चर्याच्या आणि आनंदाच्या आरोळ्या उठल्या. पॉली मावशी टॉमला कुशीत घेऊन रडायला लागली.

लटपटत्या हातांनी बायबल उचलून कापऱ्या आवाजात पाद्रीबुवांनी आनंदाचे आणि धन्यवाद देणारे मंत्र म्हणायला सुरवात केली.

आपल्यासाठी प्रार्थना होणार आहे, हे टॉमला मित्रांकडून अगोदरच कळलं होतं, म्हणूनच नेमक्या त्याच वेळेला तो चर्चमध्ये आला. टॉम तसा लब्बाडच म्हणा---

---तेव्हापासून टॉम बदलला. लोकांची त्याच्याकडं पाहायची दृष्टी बदलली. तो गावाचा 'हिरो' बनला.

गावाची आपल्याकडं पाहण्याची दृष्टी बदललेली समजल्यावर टॉमचा ग्राम्यपणाही कमी झाला.

शाळेतही बेकी थॅचरबरोबर बोलतांना टॉम भलताच सभ्य झाला होता. पण बेकीच्या शब्दाला तो मान देत होता असं नव्हे. कारण बेकीन सुट्टीच्या दिवशी सहलीची कल्पना मांडल्यावर टॉमनं ती पार उडवून लावली.

बेकीचा चेहरा संतापानं फुलून आला. टॉमला अद्दल घडवण्यासाठी ती मुद्दाम आल्फ्रेड टेम्पलजवळ जाऊन बसली. आल्फ्रेड कोण लक्षात आला का? टॉमबरोबर रस्त्यात मारामारी करणारा. तोच तो !

टॉम मनाशी म्हणाला, 'बेकी, असल्या युक्त्यामुळं मी तुझ्याशी बोलेन, असं वाटत असेल, तर भ्रमात आहेस तू !'

इतकं करूनही टॉमनं दाद दिली नाही, हे पाहून बेकी रडकुंडीला आली.

आल्फ्रेडला हुडुत् करून ती चालायला लागली, त्यावेळी आपला मामा झालाय् हे आल्फ्रेडच्या लक्षात आलं. टॉमबद्दल त्याला भयानक मत्सर वाटला.

टॉमला धडा शिकवायचा त्यानं अगदी निश्चय केला. त्याचदिवशी मधल्या सुट्टीत आल्फ्रेडला तशी संधी मिळाली.

वर्गातली सगळी मुलं- म्हणजे अगदी बेकी आणि टॉम सुध्दा- खेळण्यासाठी मैदानात गेलेली बघून आल्फ्रेड हळूच वर्गात आला. त्यानं टॉमच्या दप्तरातील होमवर्कची वही बाहेर काढली आणि सगळ्या पानांवर शाई ओतून ठेवली. मग वही बंद करून त्यानं टॉमच्या दप्तरात ठेवून टाकली.

सुट्टी संपल्याची घंटा झाल्यावर टॉम उड्या मारत वर्गात आला. गंमत अशी झाली होती की सगळ्यांची नजर चुकवून आल्फ्रेड वर्गाकडं जातो आहे, हे बेकीनं पाहिलं होतं आणि त्याचा पाठलाग करत तीही वर्गापर्यंत आली होती. आल्फ्रेडचं

शाई ओतणं तिनं पाहिलं होतं.

एकदा बेकीला वाटलं की टॉमला हे सांगावं. पण तिचं मन म्हणालं, ' टॉम फार शिष्ट आहे नाही का ? ठीक आहे ! चांगली अद्दल घडू दे त्याला !'

आल्फ्रेड वर्गाबाहेर पडल्यावर बेकी आत गेली. वर्गात आता तिच्याशिवाय कुणीही नव्हतं.

ती मांजराच्या पावलांनी शिक्षकांच्या टेबलाजवळ गेली. तिथं खोबणीत ठेवलेली किल्ली तिनं घेतली आणि हळूच टेबलाचा ड्रॉवर उघडला.

त्या ड्रॉवरमधे त्यांच्या शिक्षकांचं- श्री. डॉबिन्स यांचं- एक पुस्तक होतं. प्रत्येक दिवशी वर्गामधे मुलांना अभ्यास दिला की ते ड्रॉवर उघडत आणि आतलं पुस्तक काढून उघडून आतल्या पानांचं बराच वेळ निरीक्षण करत.

ते कसलं पुस्तक होतं, याची कुणालाच कल्पना नव्हती. पण डॉबिन्स यांचं रहस्य जाणून घेण्याची उत्सुकता मात्र प्रत्येकाला होती.

छडीचा सढळ वापर करणारे खडूस शिक्षक असा डॉबिन्स यांचा नावलौकिक असल्यामुळं त्यांच्या टेबलाचा ड्रॉवर उघडण्याची हिंमत आजवर कुणीही केलेली नव्हती. अगदी टॉम आणि हकनंही.

ती संधी आज बेकीला चालून आली होती. ड्रॉवरमधून पुस्तक काढून तिनं ते उघडून पाहिलं. त्यावर लिहिलं होतं-'अनॅटमि'. बेकीला त्याचा अर्थ कळला. पण आतली चित्र पाहिल्यावर तिला घामच फुटला. शरमेनं लालबुंद झालेला तिचा चेहरा खाली गेला.

तरीही तिनं पुस्तकाचं एक पान टरकावलं आणि घडी करून स्वतःजवळ लपवलं. घाईगर्दीनं ते पुस्तक पुन्हा ड्रॉवरमधे ठेवत असतांना घोटाळा झाला. नेमका त्याचवेळी टॉम वर्गात आला.

चोरी करतांना आपण सापडलो, म्हणून बेकी चिडली आणि ओरडली,

'माझ्यावर अशी पाळत ठेवतांना तुला लाज वाटायला पाहिजे टॉम. आता तू माझं नाव सरांना सांगणार. म्हणजे माझी कंबख्तीच होणार. दुसरं काय ?'

बेकीचं वाक्य संपतय् न संपतय् तोच मुलामुलींचा लोंढा वर्गात घुसला. त्यामुळं टॉमला काही बोलण्याची संधीच मिळाली नाही.

थोड्याच वेळात डॉबिन्स वर्गात आले. टॉमचं त्यांच्याकडं लक्ष नव्हतं. त्याच्या मनात बेकीचा विचार होता. थोड्या वेळापूर्वी मैदानात खेळतांना टॉमनं बेकीला

म्हटलं होतं,

'हॅलो बेकी ऽऽ'

खरं म्हणजे बेकीशी आपलं भांडण झालं आहे, हे तो पार विसरून गेला होता. पण बेकी मात्र हे भांडण विसरली नव्हती. ती ताडकन् म्हणाली,

'टॉम, तुझ्याबरोबर एक शब्दही बोलायची माझी इच्छा नाही.'

बेकी असं का बोलली, याचाच टॉम विचार करत होता.

डॉबिन्सनी आता गृहपाठाच्या वह्या तपासायला सुरवात केली होती.

टॉमच्या गृहपाठावर सगळी शाईच शाई होती. डॉबिन्सच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. वेताची छडी उचलून त्यांनी टॉमला झोडपायला सुरवात केली.

वास्तविक ही शिक्षा आल्फ्रेडला व्हायला हवी होती, हे बेकीला माहीत होतं. कारण शाई ओतण्याचा दुष्टपणा आल्फ्रेडनंच केला होता आणि आल्फ्रेडचं हे कृष्णकृत्य बेकीनं स्वतः पाहिलं होतं.

पण डॉबिन्सनी असा काही रुद्रावतार धारण केला होता की बेकीला कापरंच भरलं. तिच्या तोंडातून शब्दच फुटेना.

टॉमनं सगळा मार मुकाट्यानं खाल्ला.

डॉबिन्सनी सगळ्या वर्गाला अभ्यास दिला आणि टेबलाचा ड्रॉवर हळूच उघडला. बेकीनं ते पाहिलं आणि तिच्या काळजाचा ठोकाच चुकला. डॉबिन्सनी पुस्तक उघडलं. अगोदर ते भयानक चिडले होते. आता आपल्या पुस्तकाचं एक अख्खं पान गुल झालेलं पाहून त्यांच्या आगीत जणू तेल ओतलं गेलं.

'माझ्या पुस्तकाचं पान कुणी फाडलं ?', त्यांनी किंचाळून विचारलं.

डॉबिन्स असे जाम भडकले होते की बेन रॉजर्स, हार्पर, टॉम, हक, मिलर यांच्यासारखी दंगेखोर मुलंही चिडीचिप्प बसली.

डॉबिन्सनी एकच प्रश्न प्रत्येक मुलाला विचारला. बेकीचा नंबर जसा जवळ यायला लागला, तशी बेकी पांढरी- फटक पडत चालली. भीतीनं तिची जीभ टाळ्याला चिकटली.

टॉमचं बेकीकडं लक्ष गेलं.

एका सेकंदात टॉमनं मनाशी निर्णय केला आणि ताडकन् उभं राहून तो म्हणाला,

'सर, तुमच्या पुस्तकाचं पान मी फाडलं.'

सगळ्या वर्गात चमत्कारिक शांतता पसरली. बेन रॉजर्स आणि त्याचे मित्र चक्रावलेच. आल्फ्रेडलाही घाम फुटला.

भडकलेल्या डॉबिन्सनी टॉमला पकडून पुढं ओढला आणि कचकावून शंभर छड्या मारल्या. बेकी रडत होती. पण टॉमबद्दलचा अभिमान तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. कृतज्ञतेनं तिचा चेहरा भरून आला होता.

टॉमनं तिच्याकडं पाहिलं आणि मनाशी म्हणाला,

'एवढ्यासाठी आणखी शंभर फटके खायला लागले असते, तरी बेहत्तर.'

----शाळेचं पहिलं सत्र संपत आलं. आजचा शेवटचा दिवस.

टॉमच्या दृष्टीनं भयंकरच दिवस होता तो. कारण सगळ्या मुलांची लेखी परीक्षाच होती त्यादिवशी. टॉमच्या शाळेचं वैशिष्ट्य असं होतं की सगळे पालक, शाळेचे संचालक, गावातील प्रतिष्ठित लोक त्या दिवशी उपस्थित राहात असत. त्यांच्यासमोर ही परीक्षा होई.

त्यात आणखी एक गंमत होती. मुलांच्या बरोबर शिक्षकांचीही परीक्षा होत असे.

आज डॉबिन्स यांची परीक्षा होणार होती.

डॉबिन्स यांचा फज्जा उडणार, याची माहिती असल्यामुळं टॉम मात्र खुषीत होता.

आणि तसंच झालं. अमेरिकेचा नकाशा डॉबिन्सना काढायचा होता. पण फळ्याजवळ गेल्यावर त्यांना अक्षरशः घाम फुटला.

त्यांनी काढलेला अमेरिकेचा नकाशा ॲमिबासारखा दिसायला लागला. पोरं खिदळायला लागली.

घाबरलेल्या डॉबिन्सनी नकाशा हातानंच पुसला. त्याच हातानं चेहऱ्यावरचा घामही पुसला. आता तर ते विदुषकासारखे दिसायला लागले.

थरथरत्या हातांनी त्यांनी नकाशा पुन्हा काढायला सुरवात केली. आता पालकही हसायला लागले होते.

एवढ्यात एक गंमत झाली.

डॉबिन्स यांच्या डोक्यावर एक झरोका होता. त्यातून अचानक एक मांजर लोंबत लोंबत खाली आलं. डॉबिन्स यांना ते दिसणं शक्यच नव्हतं. पोरांनी मात्र दंगा करून वर्ग डोक्यावर घेतला.

डॉबिन्स गोंधळून गेले. गंमत म्हणजे त्या मांजराचं तोंड रूमालानं बंद केलं होतं आणि त्याच्या शेपटीला दोरी बांधली होती. त्या दोरीच्या आधारानं ते खाली लोंबत होतं.

पालक आणि प्रतिष्ठित मंडळीही तो गंमतशीर प्रकार पाहून गदगदा हसायला लागली.

लोंबणारं मांजर आता आणखीनच खाली आलं. ते आता नेमकं डॉबिन्सच्या डोक्यावर लोंबायला लागलं.

वर्गातल्या मुलांनी तर आता आरोळ्या ठोकायला सुरवात केली. वर्गामधे एरवी वाघाप्रमाणं गुरगुरणाऱ्या डॉबिन्सचं आता मांजर झालं होतं.

अजूनही थरथरत्या हातांनी ते अमेरिकेचा नकाशा काढायचा प्रयत्न करत होते.

पोरं आता चेकाळली होती.

शाळेच्या संचालकांनाही आता घाम फुटला होता. गावातल्या प्रतिष्ठित लोकांपुढं डॉबिन्स त्यांची लाज काढत होते.

तोंड बांधलेलं असल्यामुळं मांजर ओरडत नव्हतं. पण त्यानं आता गंमत केली.

आपल्या पुढच्या पंजानं मांजरानं डॉबिन्स यांचे डोक्याचे केस पकडले. डॉबिन्सनी घाबरून किंकाळी फोडली आणि मांजराच्या तावडीतून सुटण्यासाठी झटका दिला.

त्याबरोबर चमत्कार घडला. डॉबिन्सनी इतके दिवस लपवलेलं रहस्य उघडं पडलं. त्यांच्या डोक्यावरचा केसांचा खोटा टोप पटकन् मांजराच्या पंजात गेला.

डॉबिन्स यांचं टक्कल एकदम उघडं पडलं आणि चकाकायला लागलं. डॉबिन्स एकदम म्हातारे दिसायला लागले. एकच धम्माल उडाली. शरमेनं डॉबिन्सचा चेहरा काळाठिक्कर पडला.

मांजराला पटकन् कुणीतरी झरोक्यातून वर ओढून घेतलं. सगळीकडं एकच कल्लोळ माजला.

- आणि आश्चर्यानं आपल्याकडं पाहणाऱ्या बेकीला टॉमनं पटकन् डोळा मारला. डॉबिन्सची फिरकी घेण्याचा खट्याळपणा टॉमशिवाय दुसऱ्या कुणात होता ?

***

२८८६ ९।११८४

## ६. इन्जुन ज्योच्या मागावर

सुट्टी सुरू झाली. पण गावातलं वातावरण ढवळलं गेलं होतं. डॉबिन्स यांची झालेली फजिती अजून कुणीच विसरलं नव्हतं.

गावात गरमागरम चर्चा चालू होती.

त्यातच मफ पॉटरवर खटला सुरू झाला आणि टॉमची झोप पुन्हा उडाली. मध्यंतरी काही दिवस डॉ. रॉबिन्सन यांच्या खुनाबद्दल तो पार विसरून गेला होता.

ज्योनं त्यांची झोप पुन्हा एकदा उडवली. टॉमनं हकला एकट्याला गाठून विचारलं,

'हक, तू डॉ. रॉबिन्सन यांच्या खुनाबद्दल कुणाला काही सांगितलंस काय ?'

'हॅट् ! आपण तर त्या संदर्भात कुणाजवळ 'ब्र' सुध्दा काढला नाही.'

'पण बिचारा मफ-- '

'आता त्याला आपला काय इलाज आहे ? आणि तू ज्यादा शहाणपणा करून कुणाजवळ बोलू नकोस. ज्योला हे कळलं, तर आपली धडगत नाही.'

'तू म्हणतोयस् ते सगळं खरंच आहे. पण बिचारा मफ पॉटर मात्र हकनाक बळी जातोय्. --- हक, आपल्याला काही तरी केलं पाहिजे. स्वभावानं मफ तसा वाईट नाहीय्. एकदा तर त्यानं मला खूप मासे पकडून दिले होते.'

'तू म्हणालास ते बरोबर आहे. मफ पॉटरनं मला तर एकदा माशांचा गळच दिला होता.'

दोघांची अशी बराच वेळ चर्चा झाल्यावर, टॉम आणि हक यांनी तुरुंगात जाऊन मफ पॉटरची भेट घेतली. तंबाखू, काड्यापेटी यासारख्या वस्तू त्याला भेट

दिल्या.

बिचारा मफ ! या मुलांचा चांगुलपणा पाहून रडायला लागला.

मफवरच्या खटल्याला सुरवात झाली. त्याच्याविरुध्द पुरावाच इतका भक्कम होता, की मफला सुटण्याची अजिबात आशा नव्हती.

डॉ. रॉबिन्सनचा खून ज्या सुऱ्यानं झाला तो सुरा मफचा होता. स्वतः मफनंही ते मान्य केलं होतं.

टॉम आणि हक दोघंही दररोज कोर्टात येत होते. पण दोघंही एकमेकाला चुकवत होते. त्यांच्या मनावर प्रचंड दडपण आलं होतं.

चार दिवसात मफविरुध्द भक्कम पुरावा उभा राहिला. इन्जुन ज्योची साक्षच दोन दिवस चालली.

त्यानं तर खुनाची घटना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली होती. ती त्यानं कोर्टात रसभरीत वर्णन करून सांगितली. एक गोष्ट मोठी विचित्र होती. बचावाचे वकील चार दिवस अगदी गप्प होते. मफ पॉटरविरुध्द एवढा मोठा पुरावा उभा राहिला. खूप साक्षी झाल्या. पण एकाही साक्षीदाराला त्यांनी एकही प्रश्न विचारला नाही.

कोर्टात उपस्थित असलेल्या लोकांना काय पण स्वतः न्यायाधिशांनाही याचं आश्चर्य वाटत होतं.

शेवटी त्यांनी बचावाच्या वकिलांना विचारलं,

'बचावासाठी तुम्हाला काही सांगायचं नसेल, तर या खटल्याचा निकाल लागल्या सारखाच आहे.'

बचावाचे वकील गालातल्या गालात हसले. उभं राहून त्यांनी म्हटलं,

'माय लॉर्ड, बचावातर्फे मला फक्त एकच साक्षीदार कोर्टापुढं सादर करायचा आहे.'

'कोण ?'

'टॉम सॉयर.'

उपस्थितांना विजेचा धक्का बसावा, तसं झालं. वकीलांनी खूण केल्याबरोबर टॉम पुढं आला. आपली छाती धडधडतीय, हे त्याला जाणवत होतं.

ज्योकडं बघायचं टाळून टॉम साक्षीदाराच्या पिंजऱ्यात जाऊन उभा राहिला.

हे पोर आता काय सांगणार, असे तुच्छ भाव सर्वांच्या चेहऱ्यावर होते.

बचावाच्या वकिलांनी प्रश्न विचारायला सुरवात केली.

'तुझं नावं काय ?'

'टॉम सॉयर !'

'टॉम सॉयर, १७ जूनच्या रात्री तू कुठं होतास ?'

'मी गावाच्या स्मशानभूमीत होतो.'

टॉमनं हे वाक्य म्हणताना हळूच ज्योकडं पाहिलं. धक्का बसून आश्चर्यानं त्याचा जबडा वासला होता.

'स्मशानात तू नेमक्या कोणत्या जागी होतास ?'

'मी हूज विल्यमच्या थडग्याजवळ होतो.'

'त्यावेळी तू एकटाच होतास का ?'

'नाही, माझा एक मित्रही तिथं होता.'

'ठीक आहे टॉम, तुझ्या मित्राचं नाव तू सांगण्याची आवश्यकता नाही. पण एवढ्या रात्री तू स्मशानात काय करत होतास ?'

'आम्ही एक प्रयोग करत होतो.'

'कसला प्रयोग ?'

'आम्ही मेलेलं मांजर बरोबर नेलं होतं.'

'कशासाठी ?'

'मेलेलं मांजर सैतानाला भेटवलं की अंगावरची चामखीळ नाहीशी होते, असं आम्हाला श्रीमती हॉकिन्सनी सांगितलं होतं.'

कोर्टात लोकांच्या मनावर आलेला ताण एकदम नाहीसा झाला. सगळे उपस्थित खळखळून हसले.

न्यायाधिशांनी हातोडा आपटत म्हटलं, 'ऑर्डर- ऑर्डर !', आणि शांतता प्रस्थापित झाल्यावर ते म्हणाले,

'हे बघ बाळ, तुझे प्रयोग आम्हाला नको आहेत. स्मशानभूमीत काय घडलं आणि तू काय पाहिलंस तेवढंच सांग.'

आता टॉमला एकदम धीर आला. न्यायाधीश आपल्याच बाजूचे आहेत, याबद्दल त्याची खात्री पटली. घडलेला सगळा प्रसंग त्यानं धडाधडा सांगितला.

टॉमचे शेवटचे शब्द होते--

'इन्जुन ज्योनं सुरा उचलला आणि डॉक्टरांच्या छातीत खुपसला.'

टॉमचे शब्द पुरे होतात न होतात तोच इन्जुन ज्यो ताडकन् उभा राहिला.

शेजारच्या लोकांना ढकलून त्यानं धाव घेतली. क्षणार्धात त्यानं खिडकीतून बाहेर उडी मारली आणि बघता बघता तो दिसेनासा झाला.

कोर्टात प्रचंड खळबळ माजली.

खटल्याचाही निकाल त्याच क्षणी लागला. कोर्टानं मफ पॉटरला निर्दोष सोडून दिलं आणि ज्योला पकडण्याची आज्ञा पोलिसांना दिली.

टॉमच्या साक्षीनं चमत्कार घडवला होता. आता तर काय, टॉमचा भाव भलताच वधारला.

बेकीला तर तो जीव की प्राण झाला. थॅचर कुटुंबियांच्या घरी टॉमला अगदी सन्मानाची वागणूक मिळायला लागली.

पॉली मावशीही टॉमला 'दळभद्रं' 'कारटं' अशा नावांऐवजी 'माझा राजा' 'गुणी बाळ' वगैरे नावानं बोलावू लागली.

दिवसा टॉम गावाचा राजा होता. पण रात्र पडली की त्याची झोप उडायला लागली. हातात सुरा घेतलेला अक्राळ- विक्राळ ज्यो एकसारखा नजरेपुढं दिसायला लागला.

या वातावरणात मफ पॉटरमुळं टॉमला थोडासा दिलासा मिळाला.

टॉममुळं आपण वाचलो, हे मफला माहीत होतं.

टॉमचा तो जवळजवळ सेवकच बनला होता.

ज्योला पकडून देणाऱ्या माणसाला मोठं बक्षीसही घोषीत करण्यात आलं होतं.

सेंट लुई गावातून एक डिटेक्टिव्हही तपास करण्यासाठी आला. प्रत्येकवेळी म्हणायचा,

'मी बरोबर मागावर आहे.'

त्याचे शब्द टॉमला दिलासा द्यायचे. पण लवकरच त्याला कळून चुकलं की डिटेक्टिव्हनं मागावर असणं आणि प्रत्यक्ष खुनी हातात येणं यात पुष्कळ अंतर आहे.

बरीच खटपट करुन सुध्दा ज्यो सापडला नाही त्यावेळी डिटेक्टिव्ह सेंट लुईला निघून गेला.

बिचाऱ्या टॉमची झोप उडाली ती मात्र कायमची !

असेच काही दिवस गेले. आपल्या मनावरचं दडपण कमी करण्यासाठी टॉमनं नवीन धाडसी प्रयोग करायचं ठरवलं.

त्याच्या डोक्यात एक अफलातून कल्पना चमकून गेली.

दडवलेल्या खजिन्याचा शोध लावायचा.

त्याचं असं झालं होतं की टॉम एकदा एका पडक्या घराजवळून जात असताना दोन माणसांचं बोलणं सहज त्याच्या कानावर पडलं होतं.

'काय रे, एवढा मोठा वाडा आणि कोणीच कसं रहात नाही इथं ?', एकानं विचारलं.

'अरे, भुतांनी पछाडलाय तो वाडा. वास्तविक तेथे गुप्त खजिना आहे म्हणतात. पण भुतांना घाबरून कोणीच फिरकत नाही तिकडं.' दुसऱ्यानं उत्तर दिलं.

झालं, टॉमच्या सुपीक मेंदूला तेवढं खाद्य पुरेसं होतं. त्याच्या डोक्यात चक्रं फिरायला लागली.

एकदा कधीतरी जाऊन या खजिन्याचा शोध लावायचाच असं त्यानं अगदी पक्कं ठरवलं.

त्यानं ही कल्पना हकच्या कानावर घातली. हक काय, एका पायावर तयार होता. एका रात्री त्या वाड्यात जाऊन खजिना शोधायचा हे दोघांनी निश्चित केलं.

दिवसासुध्दा माणसं तिथं जायला घाबरत. मग रात्री कोण जाणार ? पण या वीरांनी मात्र त्या झपाटलेल्या घरात रात्रीच जायचं ठरवलं.

त्यासाठी त्यांनी शुक्रवारची रात्र निवडली. त्या रात्री दोघंही झपाटलेल्या घराजवळ जाऊन पोहोचले. सगळीकडून अंधार दाटून आला होता. त्या अंधारात ते झपाटलेलं घर इतकं भयाण दिसत होतं की, दोघांचा थरकापच झाला. पुढच्याच क्षणी दोघांनी धाडसी निर्णय केला आणि आपापल्या घराकडं धूम ठोकली.

दुसरे दिवशी सकाळी टॉमनं हकची रेवडी उडवली. तो म्हणाला,

'भित्री भागुबाई आहेस लेका.'

'जा रे ! तूच भित्रा आहेस', हक गुरगुरला.

शेवटी दोघंही धीट हे सिध्द झाल्यावर त्याच क्षणी त्यांनी आपला मोहोरा झपाटलेल्या घराकडे वळवला. जाताना ते कुदळ आणि फावडं घ्यायला विसरले नाहीत.

घराजवळ आल्यावर पुन्हा एकदा दोघांची घाबरगुंडी उडाली. पण आता माघार घेणं अशक्यच होतं.

लोंबणारी जळमटं बाजूला करून दोघांनी झपाटलेल्या घराच्या

दिवाणखान्यात प्रवेश केला.

घराची सगळी कळाच गेली होती. फरशीवर शेवाळं साचलं होतं. अधून मधून गवतही उगवलं होतं. सगळ्या कोपऱ्यात कोळ्यांची जाळी लटकत होती. भिंतीवर धुळीची पुटं चढली होती. कौलं फुटली होती. खिडक्यांच्या काचा गुल झाल्या होत्या. भिंतींचं प्लॅस्टर ढासळलं होतं.

दोघांच्याही चेहऱ्यावर निराशेचा भाव उतरला. कारण इथं काही गुप्त धन मिळायची शक्यता नव्हती. इतक्यात टॉम म्हणाला,

'हक, तो जिना बघ. असल्या घरात माळ्यावर धन दडलेलं असतं.'

हकनं टाळी वाजवली. दोघंही शूरवीर मोडक्यातोडक्या जिन्यावरून माळ्यावर जायला निघाले. जिना इतका खराब झालेला होता की त्यांच्या वजनानं तो पडतोय की काय असं त्यांना वाटायला लागलं.

माळ्यावर एका कोपऱ्यात जुनं प्रचंड लाकडी कपाट होतं. टॉमचे डोळे लकाकले. तो म्हणाला,

'मिळाला रे मिळाला ! आपल्याला खजीना मिळाला.'

दोघांनी महत्प्रयासानं कपाट उघडलं. पण आत कुबट हवेशिवाय दुसरं काहीही नव्हतं. हक म्हणाला,

'टॉम, आता एकच उपाय. आपण दिवाणखान्यात खाली जाऊ या आणि चारी कोपऱ्यात खणू या.'

हक खाली यायला निघाला आणि दचकलाच. त्यानं टॉमचा दंड पकडला. दोघेही सिमेंटच्या खांबासारखे स्तब्ध झाले.

दिवाणखान्यात पावलांचा स्पष्ट आवाज ऐकू येत होता. दोघंही धुळीनं माखलेल्या माळ्यावरच्या फळ्यांवर झोपले आणि फळ्यांच्या फटीतून खाली पाहू लागले.

दिवाणखान्यात दोन माणसं उभी होती. त्यापैकी एकाला टॉम आणि हकनी लगेच ओळखलं. त्यांच्या गावातलाच तो मनुष्य होता. बिचारा मुका आणि बहिरा होता. लोक त्याला म्हणायचे 'स्पॅनिअर्ड.'

दुसरा माणूस मात्र टॉम आणि हकला ओळखू आला नाही. त्याच्या अंगात फाटके कपडे होते. डोक्यावरची टोपी त्यानं चेहऱ्यावर ओढली होती. तो हलक्या आवाजात कुजबुजत होता.

अचानक स्पॅनिअर्ड ओरडला,

'छे ! छे ! हे शक्य नाही. हे काम आपल्याला दोघांना मिळून केलं पाहिजे. पण हे काम जोखमीचं आहे.'

मुक्या आणि बहिऱ्या स्पॅनिअर्डला बोलताना पाहून टॉम आणि हक गारीगार झाले. एवढ्यात दुसरा माणूस खेकसला,

'स्पॅनिअर्ड, तू मूर्ख आहेस !'

तो आवाज ऐकला मात्र, माळ्यावर टॉम आणि हकला घाम फुटला. तो आवाज इंजुन ज्योचा होता. टॉमनं हककडं पाहिलं. तो पांढराफटक पडला होता. दिवाणखान्यात स्पॅनिअर्ड म्हणाला,

'तुझा तू मुखत्यार आहेस. काय वाट्टेल ते कर.'

ज्यो म्हणाला,

'ही पैशाची पेटी मी इथंच ठेवणार आहे. एवढी सोन्याची नाणी घेऊन गावभर कोण हिंडणार ?'

'किती पैसे आहेत ?' स्पॅनिअर्डनं विचारलं.

'साडेसहाशे पेक्षा कमी रक्कम नाही. नाणी सोन्याची आहेत.'

'मग तुझं बरोबर आहे.' स्पॅनिअर्ड म्हणाला.

इन्जुन ज्यो त्या पडक्या दिवाणखान्यात असलेल्या चिमणीजवळ गेला. घरातील धूर बाहेर जाण्यासाठी केलेली ती जागा आता पडली होती.

मातीचा ढिगारा ज्योनं त्याच्या फावड्यासारख्या पंजानं बाजूला केला. मग तो हसला. आतून एक पेटी बाहेर निघाली.

ज्योनं पेटीचं झाकण उघडलं. आत सोन्याची पिवळीधमक नाणी होती.

स्पॅनिअर्डचेच काय पण माळ्यावरच्या दोन्ही पोरांचेही डोळे फिरले.

'सोनं !' स्पॅनिअर्ड किंचाळला, 'म्युरेलच्या टोळीनं पुरलेलं सोनं ते हेच का ?'

ज्योनं मान डोलावली.

'पण तुला कसा ह्याचा पत्ता लागला ?' स्पॅनिअर्डनं विचारलं.

'तू मूर्ख आहेस,' ज्यो खेकसला, 'मी म्युरेलच्या टोळीतच होतो. आणिऽ-- म्युरेलला कुणी संपवला, असं तुला वाटतं ?'

'क्- क्- काय ? म्हणजे- त्- त्-- तूऽऽ,' स्पॅनिअर्ड चाचरत म्हणाला.

ज्यो गदगदा हसला.

पण पुढच्याच क्षणी त्याच्या चेहऱ्यावरचं हसू संपलं. आजुबाजूला पाहात ज्यो हलक्या आवाजात म्हणाला,

'स्पॅनी, तू नुसता मूर्ख नाहीस. महामूर्ख आहेस.'

'क्- काय झालं ?' दचकून स्पॅनिअर्ड म्हणाला.

'तुझ्या पायाजवळ काय आहे ?'

स्पॅनिअर्डनं खाली पाहिलं. तो म्हणाला,

'इथं तर फक्त कुदळ आणि फावडं आहे.'

'हे आपण बरोबर आणलंय् का ?'

'नाही !'

'गेल्या खेपेला आपण इथं आलो होतो, त्यावेळी कुदळ-फावडं इथं होतं काय ?'

'नाही ऽ ! अरे बापरे-- म्हणजे-- आपल्या अनुपस्थितीत इथं कुणीतरी येऊन गेलं आहे.'

'हं ! किंवा अजूनही इथंच आहे,' ज्यो म्हणाला.

माळ्यावर लपलेल्या टॉम आणि हकचं पाणी-पाणी झालं. आता हा राक्षस माळ्यावर आला, तर आपण मेलोच. तेवढ्यात ज्योचे शब्द त्यांच्या कानावर आलेच.

'मी माळ्यावर जाऊन बघतो. एखाद्या वेळेस तिथं कुणीतरी लपलं असण्याची शक्यता आहे.'

टॉम आणि हकनी एकमेकांकडं पाहिलं. जणू दोघं एकमेकांचा शेवटचा निरोप घेत होते.

ज्योची वजनदार पावलं जिन्यावर वाजायला लागली. टॉमच्या मनात आलं- आता काही क्षण आणि आपण संपणार.

एवढ्यात गंमत घडली. मोडकळीला आलेला तो जिना ज्योच्या वजनानं धाडकन् खाली कोसळला. धडपडत, ठेचकाळत ज्यो उभा राहिला. त्यानं दोन- चार शिव्या घातल्या. मग स्पॅनिअर्डला हाक मारून तो म्हणाला,

'चल, आता आपण निघू या. इथं कोणी आलेलं असलं तरी फारसा फरक पडत नाही. मात्र आता आपण एक करणार आहोत. हे सोनं इथं ठेवणार नाही. नंबर २ मधे नेणार आहोत'.

एवढं बोलून त्यानं पेटी काखेला मारली. स्पॅनिअर्डचा दंड धरून तो बाहेर

पडला आणि दिसेनासा झाला.

पाणी पाणी झालेली दोन्ही मुलं माळ्यावर थरथरत उभी राहिली. टॉम हलक्या आवाजात म्हणाला,

'सुटलो.'

दोघांनी माळ्यावरून खाली उड्या मारल्या. फावडं- कुदळ उचललं आणि घराकडं धुम ठोकली.

दुसऱ्या दिवशी टॉम हकला भेटला. रात्रभर झोप नसल्यामुळं दोघांचेही डोळे लाल झाले होते. टॉम म्हणाला,

'हक, तुझ्या लक्षात आलं का ? स्पॅनिअर्ड मुका आणि बहिरा असल्याचं ढोंग करतोय. तो बिलंदर तर खुनी ज्योचा साथीदार आहे.'

हकनं होकारार्थी मान डोलावली.

थोड्या वेळानं टॉम म्हणाला,

'इतकी सोन्याची नाणी त्यानं कुठं नेली असतील रे ?'

'काही कल्पना नाही बुवा. पण टॉम, तुझ्या लक्षात आलं का ? ज्योच्या बोलण्यात नंबर २ हे शब्द पुन्हा पुन्हा येत होते.'

'कदाचित तो एखाद्या घराचा नंबर बोलला असावा.'

'मॅडच आहेस. एवढंसं तर आपलं खेडं. इथं घरांना नंबर कुठे आहेत ?'

काही क्षण टॉमनं आपलं डोकं खाजवलं. मग एकदम उडी मारून तो म्हणाला,

'हक, ज्योचं रहस्य मला सापडलं. आपल्या गावात गेस्ट हाऊस आहे. त्यात फक्त दोनच खोल्या आहेत. आणि त्या खोल्यांना नंबर आहेत. तू इथंच थांब. मी स्वतः जाऊन खात्री करून येतो.'

अर्ध्या तासातच टॉम धापा टाकत परत आला. पण आनंदानं त्याचा चेहरा फुलला होता. त्यानं अचूक माहिती मिळवली होती.

गेस्ट हाऊसमधे खरोखरच दोनच खोल्या होत्या. एक नंबरच्या खोलीमधे मात्र एक नवाच पाहुणा येऊन राहिला होता. त्याचे कपडे फाटलेले होते आणि तोंडावर तो नेहमी डोक्यावरची टोपी ओढत असे. टॉम म्हणाला,

'हक, मी गेस्टहाऊसच्या मालकाला विचारलं. तो पाहुणा म्हणजे नक्कीच ज्यो आहे. त्याची खोली तो नेहमी कुलुप लावून बंद ठेवतो.'

'मग आता काय करायचं म्हणतोस ?' हकनं विचारलं.

आज रात्री आपण ज्योच्या खोलीत घुसायचं. माझ्याजवळ जुन्या किल्ल्यांचा

जुडगा आहे. तूही तुझ्याजवळचा किल्ल्यांचा जुडगा घेऊन ये. दोन्ही खोल्यांना मागची दारं आहेत.'

रात्री दोघंही चोरपावलांनी गेस्टहाऊसच्या मागच्या बाजूला आले. हक हलक्या आवाजात म्हणाला,

'मी इथंच पहारा देतो. कोणी आलं तर शीळ वाजवीन.'

कंपाऊंडवरून उडी मारून टॉम चोरपावलांनी दोन नंबरच्या खोलीच्या मागच्या दाराशी गेला.

इकडं हकची छाती धाडधाड उडत होती. खोलीत ज्यो असला तर टॉमची धडगत नाही हे त्याला माहीत होतं.

हकला फारवेळ वाट पहावी लागली नाही. अवघ्या दोन अडीच मिनिटात टॉम बाहेर आला आणि भेदरलेल्या स्वरात हकला म्हणाला, 'पळ !'

दोन्ही पोरं पळत सुटली ते गावाचं दुसरं टोक आल्यावरच थांबली.

टॉम धापा टाकत म्हणाला,

'अरे बापरे ! हक, मी तर ज्योच्या अंगावरच पाय देत होतो.'

'म्हणजे ? ज्यो आत होता ?'

'मग काय ? फरशीवर झोपून तो घोरत होता.'

'पण आत पैशाची पेटी होती का ?'

'तेवढं मात्र मी पाहिलं नाही. पण आता आपण असं करूया. ज्योच्या खोलीवर पाळत ठेवूया. तो बाहेर पडला की मग आपण खोलीची झडती घेऊ. त्याची खोली उघडण्याची किल्ली माझ्याजवळ आहे.'

हकनं मान डोलावली. थोड्या वेळानं तो म्हणाला,

'टॉम, आपण असं करूया.'

'कसं ?', टॉमनं विचारलं.

'ज्योवर पाळत ठेवायला आपल्या दोघांची गरज नाही. ते काम मी करतो.'

'चालेल', टॉम म्हणाला, 'पण सावधानपणे काम कर. मी ज्यो कुठे जातो याचा मागोवा घेतो.'

मुलांची योजना ठरली खरी, पण कोणत्या दिव्यातून त्यांना जावं लागणार आहे, याची कल्पना फक्त नशीबालाच होती.

***

ठाणे
२८९६ १।१।९४

## ७. खजिन्याची गुहा

टॉम ज्योला शोधण्याच्या डिटेक्टिव्हगिरीत रमला होता. इतक्यात परगावी गेलेली बेकी थॅचर परतली. तिनं रविवारची सहल ठरवली. या खेपेला टॉमला नाही म्हणणं शक्यच नव्हतं. पण सहलीला जाण्यापूर्वी ज्योचा खजिना आपल्या हातात यावा असं मात्र टॉमला पुन्हा पुन्हा वाटत होतं. बेकीला आश्चर्यचकीत करावं असं त्याच्या मनात होतं. पण अजून हककडून कोणताही निरोप आलेला नव्हता.

सहलीला जाणारी सगळी मुलं बेकीच्या घरी जमली. सहलीची भटकंती करून यायला बराच वेळ लागणार होता. म्हणून बेकीच्या आईनं सांगितलं,

'बेकी, आज तू सुसान हार्परच्या घरीच थांब. रात्री तिच्याकडेच झोप. तुला नेण्यासाठी मी उद्या सकाळी येईन.'

बेकीच्या आईला टाटा करून सगळी मुलं बोटीत बसली आणि नदी ओलांडून पलिकडच्या तीरावर असलेल्या वनात खेळण्यासाठी गेली.

वनात त्यांनी भरपूर दंगा केला. लपंडावाचा खेळ झाला. डबे खाऊन झाले. मग त्या वनाजवळच डोंगरात दडलेली एक गुहा होती, त्या गुहेत जायची टूम कोणीतरी काढली. ही कल्पना कोणीतरी सुचवणार हे गृहीत धरून काहीजणांनी मेणबत्याही बरोबर आणल्या होत्या.

पण आता अंधार होऊ लागला होता. दमलेली मुलं गुहेच्या तोंडाजवळ जाऊन पोचली.

गुहेच्या तोंडावर बळकट दरवाजा करण्यात आला होता. अनेक माणसं इथपर्यंतच येत असत. आत जाण्याचं धाडस फारच थोडेजण करत.

मुलं मात्र बेधडक आत गेली. गुहेच्या तोंडाला लागूनच छोटे छोटे अंधारी बोळ होते. त्यात मुलं भरपूर हुंदडली. आता संध्याकाळ झाली.

परतीच्या प्रवासासाठी बोटीची घंटा घणघणायला लागली. मुलंही आता दमलेली होती. बोटीची घंटा वाजायला लागल्यावर एकेक जण बोटीकडं परतला ---

--- गेस्ट हाऊसवर नजर ठेवून हक आता थकला होता. त्याचे डोळे पेंगुळले होते. उभं राहून पाय ठणकायला लागले होते.

पण आता माघार घेणं नाही, हे हकनं ठरवलं होतं. रात्रीचे साडेदहा वाजून गेले. सगळं गाव गडद झोपी गेलं. पण ज्योच्या खोलीत अजून उजेड होता. अकराच्या सुमाराला ज्योच्या खोलीतला दिवा मालवला गेला.

कंटाळलेला हक एकदम सावधान झाला.

ज्योच्या खोलीचं दार उघडलं आणि दोन व्यक्ती अंधारात बाहेर पडल्या. हकनं ज्यो आणि स्पॅनिअर्ड यांना अचूक ओळखलं.

ज्योच्या हातात पैशाची पेटी होती. आता आली का पंचाईत ?

आता नेमकं काय करायचं ? ज्योचा पाठलाग करायचा निश्चय हकनं केला. एका अंधाऱ्या बोळात उभं राहून ज्यो आणि स्पॅनिअर्ड कुजबुजायला लागले.

पण त्यांचे शब्द अगदी स्पष्टपणे हकच्या कानावर येत होते.

'आता आपण कुठं चाललो आहोत ?' स्पॅनिअर्डनं विचारलं.

'कार्डीफ हिल !'

'का ?'

' हे खेडं आणि हा भाग सोडून जाण्यापूर्वी काही जुने हिशेब मला पुरे करायचे आहेत.'

'कसले हिशेब ?'

'तुला डग्लस आठवतो का ?'

'तो पोलिस अधिकारी ?'

'हां, तोच तो !'

'पण तो तर केव्हाच मेला.'

'तो मेला. पण मला शिक्षा करून मेला.'

'कसली शिक्षा ?'

'मी एकदा दरोडा घातला होता. त्यावेळी डग्लसनं मला पकडलं होतं आणि सगळ्या गावासमोर मला फटके मारले.'

'हांऽहांऽ ! ते मलाही आठवतं. पण आता काय त्याचं ? डग्लस मरून दोन-चार वर्षं उलटली.'

'म्हणून काय झालं ? त्याची विधवा बायको तरी अजून जिवंत आहे.'

स्पॅनिअर्ड दचकून म्हणाला,

'म्हणजे ? ज्यो, तुझा काय विचार आहे ?'

ज्योनं आपला हात मानेवरून फिरवतांना 'च्चक्' असा आवाज केला. मग तो म्हणाला,

'बुढ्ढीला कापणाराय् मी. तिच्या घरी पैसा काही थोडा नाही. स्पॅनिअर्ड, थेरडीचं सगळं घर लुटून स्वच्छ करू या.'

हवेत थंडी असूनही हकला घाम फुटला. हा ज्यो आता पिसाळला आहे. त्याला कोणत्याही परिस्थितीत थांबवलाच पाहिजे.

हक तसाच धावत सुटला. त्यानं पोलिसठाणं गाठलं. घडलेला प्रकार त्यानं थोडक्यात पण चटकन् इन्स्पेक्टरच्या कानावर घातला. शेवटी तो म्हणाला,

'आता एकेक क्षण मोलाचा आहे. तुम्हाला डग्लस बाईंच्या घरी पोचायला उशीर झाला, तर ज्यो काहीतरी भयंकर प्रकार करून बसेल.'

इन्स्पेक्टरनं हकची पाठ थोपटून म्हटलं,

'पोरा- धाडसी आहेस. तू अजिबात काळजी करू नकोस.'

त्यानं एक रग, कुडकुडणाऱ्या हकच्या अंगाभोवती गुंडाळला आणि पोलिस वेगानं निघाले.

हक पेंगत असतांनाच त्याला गोळीबार झाल्याचे आवाज ऐकू आले. झोपेतच तो समाधानानं हसला.

थोड्याच वेळात पोलिस परतले. त्यांच्याबरोबर श्रीमती डग्लसही होत्या. हकला कळलं की झटापटीत स्पॅनिअर्ड मारला गेला होता. पण ज्यो निसटला.

हकनं कपाळाला हात लावला. पोलिसांनी डग्लसना सांगितलं,

'या पोरामुळं तुमचा जीव वाचला.'

डग्लस बाई शरमल्या. हक म्हणजे वाया गेलेलं पोर, असंच त्यांना वाटत होतं. आता मात्र हकबद्दल त्यांना एकदम प्रेम वाटलं. पुढं होऊन त्यांनी हकला जवळ

घेतलं.

त्याच्या अंगाला हात लावल्यावर त्या दचकल्याच आणि म्हणाल्या,

'अगोऽबाई, हे पोर तर तापानं फणफणलंय्---'

--- दुसऱ्या दिवशी सुसान हार्पर आणि बेकीच्या आईची भेट चर्चमधे झाली.

'माझी बेकी फारच दमली असेल ना हो ? बरं झालं तिला लवकर उठवलं नाही ते. अजून झोपलेलीच आहे ना बेकी ?'

हार्पर बाईंना काही कळेचना. त्यांनी गोंधळून म्हटलं,

'बेकी ? म्हणजे काय ? तुम्ही काय म्हणताय् ? तुम्हाला काय म्हणायचंय् थॅचर बाई ?'

'अहो, माझी बेकी सहलीहून परतल्यावर तुमच्या घरीच झोपलीय् ना ?'

'नाही ! तुम्ही सांगितल्याप्रमाणं मी काल तिची वाट पाहिली, पण काल ती आलीच नाही. मला वाटलं ती घरीच गेली.'

थॅचर बाईंना भोवळंच आली.

त्यांचं संभाषण ऐकून पॉली मावशी धावत आली आणि म्हणाली,

'पण आमचा टॉम तरी तुमच्याच घरी थांबला असेल ना ? कारण तो अजून घरी आलेला नाही.'

हार्परबाई म्हणाल्या , 'नाही. टॉमसुध्दा आमच्याकडे आलेला नाही.'

आता पॉली मावशीलाही भोवळ आली.

भराभरा चौकशीला प्रारंभ झाला. किती मुलं सहलीला गेली होती आणि किती मुलं परत आली ? मग लक्षात आलं की टॉम आणि बेकी वगळता बाकी सर्वजण परत आले होते.

बेकीची आई रडायलाच लागली. पण या दोन्ही मुलांचा शोध घेण्यासाठी अवघ्या अर्ध्या तासातच सगळं गाव सज्ज झालं. घोडे, मेणबत्त्या, होड्या आणि अन्न बरोबर घेऊन जवळजवळ दोनशे गावकरी निघाले.

सगळं गाव ओसाड झाल्याप्रमाणे दिसायला लागलं. त्या रात्री गावकऱ्यांनी गुहेमधे सगळीकडे शोध घेतला. पण टॉम आणि बेकीचा कुठेच पत्ता नव्हता.

सकाळी गावात पहिला संदेश आला,

'आणखी अन्न आणि मेणबत्त्या पाठवा.'

दुपारपर्यंत शोध घेऊन दमलेली पहिली तुकडी गावात परत आली. टॉम आणि

बेकीच्या शोधाची आशा हळूहळू मावळायला लागली.

असेच तीन दिवस आणि तीन रात्री गेल्या. पॉली मावशीचे डोळे रडून रडून सुजले. पण टॉम आणि बेकी जणू अदृश्य झाले होते.

या सगळ्या प्रकरणाची माहिती फक्त एकाच मुलाला नव्हती. आणि ती म्हणजे हकला. तापानं फणफणलेला हक डग्लस बाईच्या घरी ग्लानीत पडला होता.

शुध्दीवर आला की तो एकच प्रश्न विचारायचा, 'टॉम कुठाय ?' आणि डग्लसबाई त्याच्या कपाळाचा पापा घेऊन हळुवार आवाजात म्हणायच्या,

'हक बेटा, बोलू नकोस. तू फार आजारी आहेस. चांगली विश्रांती घे---'

--- खेळायच्या नादात आपण गुहेत किती आत आलो याचं भान टॉम आणि बेकीला नव्हतं. मिळेल त्या भुयारातून प्रवास करत करत ते खूपच आत गेले. वाटेत त्यांना गरम आणि थंड पाण्याचे झरे लागले.

भुयारात तर एक जागा अशी होती की सगळ्या भिंतींना जणू पाचूचे खडे जडवले होते. चकाकणाऱ्या त्या भिंती बघून टॉम आणि बेकी थक्कच झाले.

दगडांचाच एक जिना भुयारात तयार झालेला होता. तो जिना उतरून टॉम आणि बेकी खाली गेले. आपण नको इतके आत जातो आहोत याचं भान बेकीला नसलं तरी टॉमला खचितच होतं. म्हणूनच परत येताना वाट सापडावी यासाठी टॉम दगडी भिंतीवर जागोजागी खडूनं खुणा करत होता.

हातातली मेणबत्ती विझत नाही तोपर्यंत दोघांनाही गंमत वाटत होती. पण मेणबत्ती संपत आली तसा गुहेतला अंधार त्यांना खायला उठला. दोघांचाही थरकाप झाला. परतीची वाट शोधण्यासाठी दोघेही भुयारातून पळायला लागले. पण वाट काही सापडेना. धावता धावता वाटेत त्यांना एक पाण्याचं तळ लागलं. भुयारात येताना हे तळं लागलेलं नव्हतं. त्यामुळे आपण वाट चुकलेले आहोत याबद्दल टॉमची खात्री पटली. भिंतीवर केलेल्या खुणांचाही कोठे मागमूस दिसेना.

सहलीला आलेल्या एकाही मुलाचा आवाज त्यांना ऐकू येत नव्हता. बेकी टॉमला म्हणाली,

'आपले सगळे मित्र गेले कुठं ?'

पण टॉमलाही निश्चित काही सांगता येईना. थोडावेळ भयाण शांततेत गेल्यावर तो म्हणाला,

'बेकी, आपण रस्ता चुकलो आहोत. आता थोडावेळ विश्रांती घेऊन मग रस्ता

शोधला पाहिजे.'

प्रयत्न करूनही रस्ता सापडेना त्यावेळी टॉमनं आपल्या मित्रांना हाका मारायचा सपाटा लावला. प्रत्यक्षात मात्र कोणाची ओ ऐकू येण्याऐवजी गुहेतले प्रतिध्वनी दोघांच्या कानावर आले.

आता टॉमही घाबरला होता. पण बेकीला तसं दाखवून देणं आता योग्य नव्हतं. बेकी तर पार दमलेली होती. तिथंच दगडाला टेकून ती बघता बघता झोपी गेली. बेकी जागी झाल्यानंतर प्रसंगाचं गांभीर्य तिच्या लक्षात आलं.

दोघांनी मिळून पॅकेटमधलं थोडसं अन्न खाल्लं. तळ्याचं पाणी प्यायलं. आणि बाहेर जाण्याची वाट शोधायला सुरवात केली. चालून चालून त्यांचे पाय तुटायची वेळ आली. पण बाहेर जाण्याचा रस्ता मिळत नव्हता.

मनातून हदरलेला टॉम बेकीला खोटा धीर देत होता.

असेच दोन तीन दिवस गेले. जवळचं सगळं अन्न संपलं. मेणबत्तीचाही फक्त एकच तुकडा शिल्लक राहिला. बेकीला घेऊन टॉम रस्ता शोधायचा प्रयत्न करत होता. पण आता आपण मरणार अशी त्याची पक्की खात्री झाली होती.

होता होता मेणबत्तीचा तुकडाही जळून गेला. अंधारात चाचपडत ही दोन्ही मुलं धडपडत ठेचकाळत पुढे जायला लागली.

आणि चमत्कार घडला. भिंतीपलिकडच्या बोळातून मेणबत्तीचा उजेड येताना टॉमला स्पष्ट दिसला.

बेकीला मागं बसवून तो पुढं धावला. बोळातून येणारा प्रकाश अधिकच ठळक होत गेला.

धडधडत्या अंतःकरणानं टॉम वाट बघायला लागला. मेणबत्ती धरलेला हात पुढे आला आणि त्या मागोमाग माणूसही.

मेणबत्तीच्या उजेडात टॉमला जे दिसलं ते पाहून टॉमच्या काळजाचा ठोकाच चुकला. कारण मेणबत्ती घेतलेला तो माणूस म्हणजे इन्जुन ज्यो होता.

भीतीनं टॉमनं भयाण किंकाळी फोडली. त्याचा परिणाम उलटाच झाला. आपल्या शिवाय कोणी भुयारात असेल याची ज्योला कल्पना नव्हती. शांत गुहेत टॉमचा घुमलेला आवाज ज्योला अजिबात ओळखला नाही.

तोच इतका घाबरला की वाट फुटेल तिकडे धावत सुटला.

आपलं नशीब इतकं चांगलं असेल, असं टॉमला वाटलं नव्हतं. ही गोष्ट

बेकीला न सांगण्याचा शहाणा निर्णय त्यानं मनाशी चटकन् केला.---

--- मंगळवारची संध्याकाळ झाली. शोधासाठी बाहेर गेलेली माणसं श्रमलेल्या पायांनी परतली. आता मुलं जिवंत असण्याची आशाच सगळ्यांनी सोडली होती.

पॉली मावशी आणि थॅचर बाई दोघीही आजारी पडल्या होत्या. काळजीनं पॉली मावशीचे केस पांढरे झाले होते, तर थॅचर बाईंची प्रकृती पार ढासळली होती.---

--- बेकीनं आता सगळी आशा पार सोडली होती. पण सगळीच परिस्थिती प्रतिकूल झाल्यावर टॉम मात्र अधिकच निश्चयी झाला होता.

बराच वेळ विचार केल्यावर त्याच्या लक्षात आलं की तो बेकीबरोबर एकाच भुयारामधून प्रवास करत आहे. कदाचित् शेजारच्या भुयारामधून प्रवास केला, तर वाट मिळेलही.

एका नव्या जिद्दीनं आणि उमेदीनं टॉमनं वाट शोधायला सुरवात केली आणि त्याला ताबडतोब यश मिळालं. दोन दगडांच्या मधे मोठी वाट होती.

त्यातून डोकं वर काढून टॉमनं बाहेर पाहिलं. समोर नदीचा प्रवाह अथांग वाहात होता.

टॉमला हसू आलं. इतकी सोपी युक्ती आपल्या लक्षात कशी आली नाही ?

दमलेल्या बेकीला हाताला धरून त्यानं बाहेर काढलं. तो स्वतःही बाहेर आला.

त्यांच्या सुदैवानं एक मोटारबोट किनाऱ्यावरून नुकतीच सुटणार होती. टॉमनं हात केला. बेकीसह तो मोटारबोटमधे चढला.

त्यातल्या लोकांनी टॉमला ओळखलं नाही. मात्र थॅचरांची मुलगी म्हणून बेकी त्यांच्या ध्यानात आली. आनंदाचा कल्लोळ झाला.

टॉम आणि बेकी सुखरूप असल्याची बातमी गावात पोचली. आनंदाश्रूंना पूर आला.

उबदार ब्लँकेटमधे गुंडाळून दोन्ही मुलांना खेड्यात आणण्यात आलं.

टॉम आणि बेकी सुखरूप परत आलेले पाहून पॉली मावशीला धन्य झालं. थॅचर बाईंचा आजार चुटकीसरशी पळाला.

पॉली मावशीनं भुकेजलेल्या दोन्ही मुलांना गरम गरम अन्न वाढलं. विश्रांतीनंतर टॉमनं आपला धाडसी प्रवास तिखट- मीठ लावून सांगितला.

सगळेजण आऽवासून ऐकत होते. मधेच बेकी चिवचिव करत होती. टॉम हा आता तिच्या स्वप्नीचा राजकुमार बनला होता.

दोन आठवड्यानंतर हक पूर्ण बरा झाल्यावरच हकला भेटायची परवानगी टॉमला मिळाली. किती बोलावं असं त्या पोरांना झालं होतं.

मग थॅचरनीही टॉमची पाठ थोपटली. आणि सांगितलं,

'टॉम, तू ग्रेट आहेस. पण आता कुणी मुलांनी त्या गुहेत जाऊ नये, म्हणून आम्ही खास काळजी घेतली आहे. लाकडी दारं काढून त्या जागी पक्का लोखंडी दरवाजा बसवला आहे आणि त्यावर तीन पक्की कुलुपं आहेत. एखाद्या दरोडेखोरालाही तो दरवाजा आता उघडायचा नाही.'

टॉम धसकलाच. दरोडेखोर शब्दावरून त्याला आठवलं. टॉमच्या चेहऱ्यातील बदल थॅचर यांच्या ध्यानी आला. त्यांनी विचारलं,

'काय रे टॉम, काय झालं ?'

'थॅचरसाहेब, मी पार विसरून गेलो होतो. गुहेत इन्जुन ज्यो आहेऽऽ'

---- थॅचरनी पोलिसांच्या मदतीनं गुहेचं दार उघडलं. आत काही फुटांवरच इन्जुन ज्योचा मृतदेह पडला होता. डोळे बाहेर आलेला आणि उंदरांनी कुरतडलेला. सर्वत्र कुबट वास भरला होता.

एवढा निर्दय ज्यो. पण गुहेत सापडल्यावर त्याची अवस्था कोकरासारखी झाली होती. केविलवाणेपणानं तो ओरडत फिरत असावा. मेणबत्त्यांचे तुकडे आणि कीटक खाऊन त्यानं भूक मारायचा प्रयत्न केला. पण उपासमार अशी झाली की ज्योसारखा गडीही खलास झाला.

त्याचा मोडलेला सुरा गुहेच्या दरवाजाजवळ पडला होता.

शेवटचा प्रयत्न म्हणून त्यानं त्याच्या सुऱ्याच्या सहाय्यानं लोखंडी दार उघडण्याच्या केविलवाणा प्रयत्न केला होता.

गुहेत इन्जुन ज्योचे किती भयानक हाल झाले असतील, याची कल्पना आलेला टॉम शहारलाच ---

--- इन्जुन ज्योचा दफनविधी पार पडल्यावर टॉमनं हकला गाठलं. तो म्हणाला,

'हक, इन्जुन ज्यो संपला. पण त्याचा खजिना अजूनही गुहेतच आहे.'

'नक्कीच. कारण पोलिसांनी गेस्ट हाऊसमधली दोन नंबरची खोली तपासली. पण रमशिवाय त्यांना तिथं काहीच मिळालं नाही.'



BVBK-0402896

'कसं सापडेल ? ज्योनं सगळा खजिना गुहेतच दडवला आहे.'

हकनं एक सुस्कारा टाकला. तो म्हणाला,

'टॉम, आता आपण काहीही करू शकणार नाही.'

'का रे ?'

'कसं शक्य आहे ते ? आता तर गुहेच्या तोंडावर पक्क दार बसवलंय. आपल्याकडच्या छोट्या किल्ल्यांनी ते उघडायचं नाही आणि थॅचरसाहेब काही गुहेच्या किल्ल्या आपल्याला द्यायचे नाहीत.'

टॉम खोऽ खोऽ हसला. म्हणाला,

'इथं कुणा लेकाला किल्ल्या हव्या आहेत ? मला सगळ्या चोरवाटा माहीत आहेत.'

हकचे डोळे विस्फारले.

'मग टॉम, आता उशीर कशाला ? चल निघू या.'

कुदळ, फावडी घेऊन दुक्कल निघाली. नदीजवळच्या दगडावर दोघं पोचले. इथूनच टॉम बेकीला घेऊन बाहेर पडला होता.

ती जागा शोधायला त्याला अजिबात त्रास झाला नाही.

दगडाच्या खोबणीतून दोघंही गुहेत उतरले.

'तुला परतीची वाट सापडेल ना ?' हकनं विचारलं.

'तू आता काळजीच करू नकोस.' टॉमनं आत्मविश्वासानं सांगितलं.

इन्जुन ज्योच्या मुक्कामाची जागा टॉमनं अंदाज केल्याप्रमाणं अगदी जवळ होती. तिथं ज्योजवळची छोटी पेटी होतीच. पण जवळच खणलेल्या जागेवर एक क्रॉसही पुरला होता.

'हक, तूला आठवतं का ? त्या झपाटलेल्या घरात ज्यो खोलीनंबर दोन बरोबर क्रॉसचाही सारखा उल्लेख करायचा.'

'शंकाच नाही. हीच ती जागा.'

फावड्याच्या सहाय्यानं दोघांनी माती बाजूला केली. आत आणखी दोन मोठ्या पेट्या होत्या. दोन बंदुका आणि स्फोटक दारूची पावडरही सापडली.

तिन्ही पेट्यात मिळून एवढी रक्कम आणि सोनं होतं की हकनं उडीच मारली. टॉमनं त्याला मिठी मारून म्हटलं,

'हक, आपण लक्षाधीश झालो आहोत.'

दोराच्या सहाय्यानं त्या पेट्या त्यांनी गुहेतून बाहेर काढल्या. तराफ्यावर घालून

गावात आणल्या आणि थेट थॅचर यांच्यापुढं ठेवल्या. आतली अपार संपत्ती बघून थॅचर यांचं आईस्क्रिम झालं. ही बातमी वाऱ्यासारखी गावात पसरली.

आता टॉम म्हणजे 'सुपरमॅन' झाला होता. स्थानिक वृत्तपत्रात टॉमचं चरित्र आणि त्याच्या धाडसी प्रयत्नांची सगळी हकीगत सविस्तर छापली होती.

थॅचर आता टॉमला 'मिस्टर टॉम सॉयर' म्हणू लागले. त्यांचा तो भावी जावई होता. बेकीचा आनंद मनात मावत नव्हता.

गडगंज श्रीमंती असलेल्या पण मूल नसलेल्या डग्लस बाईंनी हकला दत्तक घेतलं. हक एकदम श्रीमंत झाला. खजिन्यातील मोठी रक्कम टॉमला बक्षिस मिळाली. उरलेली सरकारजमा झाली.

टॉम आणि हक यांना गावात भलतीच सन्मानाची वागणूक मिळायला लागली. त्यामुळं दोघांना नेहमीसारखा खट्याळपणा करता येईना.

म्हणून टॉमनं हकला एके दिवशी घराबाहेर काढलं. मित्रांना गोळा केलं आणि तराफा नदीत ढकलला. पुन्हा एकदा नव्या धाडसासाठी !

टॉमचे मित्र हकबरोबर आनंदानं गाऊ लागले-

**'इन्जुन ज्योचे भूत**
**बाटलीत केले बंद**
**अस्सा आमचा टॉम**
**आहे हो बेबंद !'**

**'सोन्याच्या राशी**
**चांदीची नाणी**
**गाऊ आपण सारे**
**मज्जेची गाणी'**

**'जाता- जाता- जाता**
**आपुले हे 'कॉयर'**
**अफलातून आमुचा**
**अस्सा टॉम सॉयर- टॉम सॉयर- टॉम सॉयर.'**

***



२८९६ दिनांक ९।७।९४